पब्लिक पंचनामा
publicpanchanama.blogspot.com
लोकलढ्याचा साथीदार
◆ संपादक – विजय सिध्दावार ◆ विशेष पुरवणी ◆ २० ऑगस्ट २०१९


# आमची एल्गारबाई



शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी श्रमिक एल्गारची स्थापना झाली. श्रमिक एल्गारच्या स्थापनेला यंदा २० ऑगस्ट रोजी २० वर्ष पूर्ण होत आहेत. या द्विदशकाच्या कार्यकाळात संघटनेने केलेल्या कार्याचा आढावा घेणारी ही विशेष पुरवणी.

## श्रमिक एल्गार
## द्विदशक वर्षपूर्ती
१९९९–२०१९

"साध्याच माणसांचा
एल्गार येत आहे,
हा थोर गांडुळांचा
भोंदू जमाव नाही."

– कविवर्य सुरेश भट

# ॲड. पारोमिता गोस्वामी यांचा परिचय

## वैयक्तीक माहिती

**नाव - ॲड. पारोमिता गोस्वामी**

पत्ता - मु. चितेगाव, ता. मुल जि. चंद्रपूर, (म. रा.)
जन्मतारीख - 9 फरवरी 1970
मोबाईल - 9422909611
इमेल - paromita_g@yahoo.com, goswami.paromita@gmail.com



### कौटुंबिक माहिती :-

पती - डॉ. कल्याणकुमार : ॲडव्होकेट, हायकोर्ट नागपूर बेंच
वडिल - कर्नल प्राणगोपाल गोस्वामी : निवृत्त कर्नल
आई - सौ. सुमिता गोस्वामी : सेवानिवृत्त शिक्षिका
भाऊ - प्रोदिप्तो गोस्वामी : कर्नल (दिल्ली येथे कार्यरत)

### शिक्षण :-

माध्यमिक व उच्च माध्यमिक - केंद्रिय विद्यालय फोर्ट विल्यम कोलकत्ता
बि. ए. इंग्लीश - संत झेवियर्स कॉलेज, कोलकत्ता (कोलकत्ता विद्यापीठ कोलकत्ता )
एम. ए. समाजकार्य - टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई (1995) सुवर्णपदक
एल. एल. बी. :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ नागपुर (2003)

### केलेले कार्य - स्थापन केलेल्या संस्था - संघटना :-

**श्रमिक एल्गार -**

1. असंघटित क्षेत्रातील महिला, आदीवासी, दलित, कामगार, शेतकरी, शेतमजूरांची संघटना.
2. चंद्रपूर-गडचिरोली जिल्हयात संघटनेचे 25 हजार सभासद. 500 चे वर स्वयंसेवी कार्यकर्ते.
3. चंद्रपूर जिल्हयात 15 व गडचिरोली जिल्हयात 2 तालुक्यात कार्य.
3. या संघटनेच्या माध्यमातुन गंजबसौदा मध्यप्रदेश येथून 167 वेठबिगाराची मुक्तता व प्रशासनाचे मदतीने पुर्नवसन.
4. 500 वर कोलाम, गोंड आदीवासीनां त्यांचे जमिनीचे हक्क मिळवून दिले.
5. चिन्ना मट्टामी या माडिया तरूणाला नक्षलसमर्थक म्हणून पोलीसांनी ठार मारले. चिन्नाची आई जब्बेबाई हिला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष. गडचिरोली जिल्हयातील 10 हजाराचे वर निष्पाप आदीवासी तरूणांकडून नक्षलसमर्थक म्हणून पोलीसांनी भरलेले फॉर्म (सी नोट) रद्द करविले.
6. 1000 चे वर तरूण कामगारांची फ्रुट कंपनीच्या जाचातुन सुटका करण्यात पुढाकार
7. निराधार, अपंग, बांबुकामगार, मुलांचे शिक्षणाचे प्रश्नावर वेळोवेळी, मोर्चे, आंदोलनाचे माध्यमातुन लोकलढा.
8. राजीव गांधी घरकुल योजना क्रं. 1 चे 281 लाभार्थ्यांना 2 कोटी रूपये थकीत निधी मिळवून देण्यासाठी लढा.
9. संजय गांधी निराधार योजनेच्या शासन निर्णयात बदल करवून निराधारांना लाभ घेण्यास अडचणीच्या ठरलेल्या जाचक अटी रद्द करण्यासाठी लढा.
10. रोजगार हमी योजनेचे मजूरांना प्रशिक्षण, कामाची मागणी व योजनेतील भ्रष्टाचार उघडकीस आणून मजुरांना न्याय.
11. जबरानजोतधारक (अतिक्रमणधारक) पट्टे देण्यासाठी संघर्ष, वनहक्क कायद्याची अमंलबजावणीसाठी कार्य.
12. भुमी हक्क अभियानच्या माध्यमातुन जमिन कायद्याचे प्रशिक्षण व अतिक्रमणदारांचे अतिक्रमण कायम ठेवण्यासाठी लढा.
13. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रात मंजूर झालेल्या अदानी कोल माईन्सचे विरोधात चंद्रपूर बचाव संघर्ष समितीसोबत संघर्ष करून पर्यावरण रक्षणासाठी कार्य.
14. वनक्षेत्रात असलेल्या बांबु कारागीर आदीवासींना त्यांचे निस्ताराप्रमाणे व अल्प दरात बांबू मिळावे यासाठी संघर्ष.
वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चंद्रपूर जिल्हा दारूमुक्ती अभियान.
15. व्यसनमुक्त समाजाची निर्मितीसाठी चंद्रपुर जिल्हयातील दारूचे सर्व परवाने रद्द करून, चंद्रपुर जिल्हयाचे दारूमुक्तीचे आंदोलन.
16. 7000 महिला-पुरूषांची चंद्रपूर येथे रॅली, जुब्ली हायस्कुल येथे जाहीर सभा.
17. 30 संप्टेबर 2010 रोजी चंद्रपुर जिल्हयातील 15 तालुक्यात तहसिल कार्यालयासमोर महिलांचे लाक्षणिक उपोषण.
18. 100 च्या वर ग्राम सभेतुन चंद्रपूर जिल्हा दारूमुक्तीसाठी ग्राम सभेचे ठराव मंजुर.
19. उमरी पोद्दार तहसिल पोंभुर्णा जि. चंद्रपूर येथील परवानाचे दारू दुकान बंद करण्यासाठीचा यशस्वी लढा.
20. जिवती व बोरचांदली ता. मुल येथील प्रस्तावित बियर बार ला परवानगी मिळू नये यासाठी लढा.
21. चंद्रपूर जिल्हा दारूमुक्त करा या मागणीसाठी 6000 च्यावर महिला-पुरूषांची क्रांतीभुमी चिमुर ते विधानसभा नागपुर अशी पाच दिवसांची ऐतिहासीक पद यात्रा.
22. चंद्रपूर जिल्हयातील 40 च्यावर गावातील अवैध दारू विक्री बंद करून, गावात दारूबंदी.
23. 200 कार्यकर्तासोबत जेलभरो आंदोलन 6 दिवस नागपूर कारागृहात
24. दारूबंदीसाठी पालकमंत्रीच्या घरासमोर मुंडण आंदोलन
25. 1 एप्रिल 2015 पासून चंद्रपूर जिल्हयात दारूबंदी लागू करवून घेतली.
26. दारूबंदीनंतर, दारूबंदीच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी शासनासोबत पाठपुरावा,
27. बिहार दारूबंदीचा अभ्यास
28. दारूबंदीच्या जनजागृतीसाठी माराई पाटण ते महाकाली पदयात्रा
29. चंद्रपूर-गडचिरोली-वर्धा या तिन जिल्हयातील दारूबंदीच्या अमंलबजावणीसाठी तिनही जिल्हयातील कार्यकत्याची बैठक, तीनही जिल्हयात आंदोलन
30. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून जिल्ह्यातील महिलांना व बचत गटांच्या महिलांना व्यसनमुक्ती व दारूबंदीचे प्रशिक्षण

### एल्गार प्रतिष्ठान :-

1. समाजातील वंचित घटकांच्या सर्वांगीन विकासासाठी 1999 मध्ये एल्गार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेची स्थापना.
2. संस्थेच्या माध्यमातुन तरून, महिला, मुलांना कायदा, संघटना बांधणी, लघु उद्योगावर प्रशिक्षण.
3. कौटुंबिक सल्ला केंद्राच्या माध्यमातुन महिलांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळवून देणे.
4. 200 बचत गटाची स्थापना करून महिला सक्षमीकरण.
5. शहीद संदेश यात्रा, सायकल रॅलीने निघालेल्या यात्रेतुन स्वांतत्र्य लढयाची माहिती ग्रामीण भागातील जनतेला दिली.
6. शहिद स्मृती अभियान, 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य लढयाला 150 वर्ष पुर्ण झाल्यानिमित्य चंद्रपुर व गडचिरोली जिल्हयातुन शहीद स्मृती अभियान आयोजन. 1857 च्या लढयाचा इतिहास ग्रामीण भागातील जनतेला, शाळकरी मुलांना सांगितले.
7. सावित्री - फातिमा नमन अभियान - महिलांचे प्रश्न समजुन घेण्यासाठी व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी चंद्रपुर व गडचिरोली जिल्हयात सावित्री - फातिमा नमन अभियान काढून महिलांशी संवाद.
8. वीर बाबुराव शेडमाके प्रशिक्षण संकुल.
9. ग्रामीण भागातील महिला, आदीवासी तरूण, तरूणी यांना संघटना बांधणी, कायदे, व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण.
10. बचत गटातील महिलांना रोजगार विषयक प्रशिक्षण.
11. तरूणांना, स्वंयमसेवकांना मार्गदर्शन शिबीर.
12. रेशन, रॉकेल, पाणी समस्या, चा-याची टंचाई, रोजगार अशा सामाजिक प्रश्नावर सर्वेक्षण करून लोकांचे प्रश्न प्रशासनापुढे आणले.
13. एल्गार बालविज्ञान व पर्यावरण केंद्र
14. ग्रामीण भागातील विद्यार्थांत वैधानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी आणि अंधश्रध्दा निर्मुलन करण्यासाठी मुल येथे एल्गार बालविज्ञान पर्यावरण केंद्राची स्थापना. 1000 च्या वर विद्यार्थ्यांनी या केंद्राचा लाभ घेतला.

### सहकार क्षेत्रातील कार्य :-

1. एल्गार महिला बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. राजोली.
दुर्बल घटकातील महिलांना घेवून 2003 मध्ये संस्थेची स्थापना 500 च्यावर महिला सभासद मुल, राजोली, पोंभुर्णा येथे शाखा एल्गार महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्था मर्या. राजोली या पतसंस्थेची निर्मिती स्वबळावर 1 करोड चे वर वार्षिक उलाढाल.
2. गरीब आदीवासी अल्प भु-धारक शेतक-यांना सावकरी पाशातुन मुक्त करण्यासाठी, दिंडी यासारख्या प्रथेतुन बाहेर काढण्यासाठी व नव-नवीन तंत्रज्ञान देण्याकरिता शेतक-यांच्या खालील शेती विकास सहकारी संस्थांची स्थापना करण्यास पुढाकार व मार्गदर्शन. 1000 च्यावर आदीवासी, शेतकरी, महिला सभासद.
3. जिवती तालुका शेती विकास सहकारी संस्था मर्या. जिवती.
4. किसान बहुउद्देशीय शेती विकास संस्था पोंभुर्णा.
5. एल्गार किसान बहुउद्देषीय सहकारी संस्था सावली.

### फेलोशीप व पुरस्कार :-

1. 2019 - सी. मो. झाडे फाउंडेशनतर्फे मीराबेन शाह सामाजिक कार्य पुरस्कार
2. 2019 - अकोला जिल्हा सेवा समिती तर्फे स्व. विनयकुमारजी पाराशर स्मृतिप्रित्यार्थ गौरव पुरस्कार
3. 2018 - शारदा सन्मान पुरस्कार, ॲग्रीकल्चर डेव्होलपमेंट ट्रस्ट, बारामती
4. 2018 - मुक्ता सन्मान पुरस्कार, न्यूज़18लोकमत
5. २०१६ - संघर्ष सन्मान पुरस्कार, मुक्तांगण संस्था
6. २०१५ - जनमंच जनगौरव पुरस्कार, जनमंच, नागपूर
7. २०१३- महात्मा गांधी पुरस्कार, सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन
8. २०१२- कमलताई होस्पेट संस्थापिका अवॉर्ड, मातृसेवा संघ
9. २०११- महाराष्ट्रीयन ऑफ द इअर, (सामाजिक कार्य)
10. २०११- पी. बी. सामंत संघर्ष पुरस्कार, केशव गोरे स्मारक ट्रस्ट (मृणाल गोरे यांच्या हस्ते)
11. 2010 - रूक्मीणी पुरस्कार (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक)
12. 2009 - कस्तुरबा गांधी पुरस्कार (लोकसेवा आणि विकास संस्था चंद्रपूर)
13. 2008 - राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थान हैद्राबाद (भारत सरकार) व्हिजीटिंग फेलो.
14. 2007 - केसरी - लोकसत्ता इअर ऑफ द विमेन अवार्ड
15. 2006 - युवा पुरस्कार (छात्र भारती)
16. 2005 - कर्तव्य निष्ठा पुरस्कार (ज्ञानदा संस्था वरोरा)
17. 2005 - 2006 येल वर्ल्ड फेलोशिप (अमेरिका)
18. 2004 - आयझानहॉवर फेलोशिप (अमेरिका)
19. 2004 - ॲड. केशवराव नालमवार प्रेरणा पुरस्कार (दैनिक महाविदर्भ समुहव्दारा)
20. 2003 - गडचिरोली गौरव पुरस्कार (प्रेस क्लब गडचिरोली)
21. 2002 - अशोका फेलोशिप
22. 1999 - सदस्य, प्रतिनिधी, मानवाधिकार आयोग (कारागृहातील महिलांना मदतीकरिता)
23. 1999 - मध्ये UNO शी संलग्नीत कॉमन फयुचर फोरम चे सदस्य.

### लेखन व प्रकाशन :-

1. डॉन ॲट माणिकगड (माणिकगडावरील पहाट)
2. छत्री कायदा वैशिष्ट्य व नियम (असंघटित मजुरांसाठी प्रस्तावित कायद्याचे सोपे रूपांतर)
3. महात्मा गांधी ॲज अ कम्युनिटी आर्गनायझर (महात्मा गांधी यांचे संघटन कौशल्य )
4. सोशल सिक्युरिटी फॉर अनआर्गनाइज्ड सेक्टर (असंघटीत क्षेत्राकरिता सामाजिक संरक्षण)
5. 'विमेन्स कन्सर्स इन लॅंड रिफार्म्स' कार्यशाळा अहवालाचे संपादन (एनआयआरडी चे प्रकाशन) (राष्ट्रीय जमिन सुधारणा धोरणात महिलांचे स्थान)
6. विविध वर्तमानपत्र, मासिक यात लेखन.

### विद्यापीठात मार्गदर्शन :-

1. मॅडीसीन एरिया टेक्नीकल कॉलेज, विस्कानसीन (अमेरिका)
2. येल विद्यापीठ (अमेरिका)
3. टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई.
4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ नागपुर.
5. स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
6. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थान (एन. आय. आर. डी. हैद्राबाद) भारत सरकार.

### पत्रव्यवहाराचा पत्ता :-

- ॲड. पारोमिता गोस्वामी,
व्दारा : श्रमिक एल्गार,
मुल - नागपुर हायवे, मुक्काम चितेगाव
तह. मुल, जि. चंद्रपुर
पीन - 441224





श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

# श्रमिक एल्गार : जन्म आणि नामकरण

देवनाथ गंडाटे





धुऱ्याच्या वादावरून मला अटक करण्यात आली. पोलिसांनी आचारसंहितेचे गुन्हे दाखल करून जेलमध्ये पाठविले. मी पोलिसांना पैसे देऊ शकत नव्हतो. जेलमध्ये ताई भेटायला आल्या. त्यांनी माझी सोडवणूक केली. मला गावी पोहोचवून दिले. माझ्यासारख्या गरीब माणसाला कोणतीही ओळख नसताना ताईने केलेली मदत मी जन्मभर विसरणार नाही.

**- गोपाळा गावडे**
चिटकी, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर



गावात मातीच्या तेलाची समस्या निर्माण झाली होती. त्यावर तोडगा काढण्यासाठी ताईने मोर्चा काढण्याचे ठरविले. सिंदेवाहीत मोर्चा निघाला. पोलिसांनी अटक केली. नागपूरच्या जेलमध्ये डांबलं. जामिनावर सुटका झाली. आता न्याय हक्कासाठी लढा देतांना पोलिस, जेलची भीती वाटत नाही. मनातील भिती दूर झाली. गरिब माणूस ताठ मानेनं उभा राहिला. ताई म्हणजे आधार, ताई म्हणजे दिशा आहे.

**- शांताबाई मडावी**
चिटकी, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर



1999 मध्ये चिटकी या गावात श्रमिक एल्गारच्या स्थापनेसाठी झालेली पहिली बैठक.

१९९९ चा तो काळ. पावसाचे दिवस सुरू होते. लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु होती. आचारसंहिता लागली. अशातच सिंदेवाही तालुक्यातील चिटकी येथे आदिवासी समाजाच्या गावडे भावंडामध्ये शेतीच्या धुऱ्यावरून भांडण झाले. प्रकरण पोलिसांत गेले. गोपाळा गावडेला अटक करण्यात आली. ठाणेदार भलावी यांनी कठोर कारवाईची ताकीद दिली. गोपाळाची बायको घाबरली होती. ढसाढसा रडत होती. पोलीस पाटलाच्या दारी गेली. पण काही फायदा झाला नाही. त्याला सोडविण्यासाठी त्याच्या बायकोला पाच हजारांची मागणी पोलिसांकडून करण्यात आली. इतके पैसे कुठून द्यायचे, प्रश्न होता. जणू आभाळच कोळसले होते. घरी पोरं डोळ्यात बापाच्या येण्याची प्रतीक्षा करीत बसले होते. गावक-यांनीही त्याला सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, हाती निराशा आली. अशातच काहींनी राजकीय नेत्यांकडे जाऊन त्यांच्या घराच्या पायऱ्या झिजवल्या. तेव्हा छबिलभाई हे मोठेनेते होते. त्यांनीही आचारसंहिता असल्याने हात झटकले. गोपाळाला चंद्रपूरच्या जेल डांबण्यात आले. निवडणूक आणि आचारसंहिता सुरु असल्याने गोपाळाच्या सुटकेची आशा संपली होती.

याच काळात मूल तालुक्यातील बाबा वडलकोंडावार यांच्याकडे एक तरुणी आली होती. बाबांकडे मुंबईहुन चळवळीत काम करणारी एक तरूणी आल्याचे विजय सिद्धावार यांना कळले. ते प्रबोधन संस्था चालवीत असत. समाजकार्याची धडपड असल्याने त्यांनी त्या तरुणीची भेट घेतली. बाबांनी त्या तरुणीची ओळख करून दिली. ही "पारोमिता गोस्वामी". मूळची बंगालची, मुंबईहून आली आहे. पारोमिताला मदत करण्याची वडीलधारी सूचना केली. सिद्धावार यांनी नवभारत शाळेतील त्यांचे सहकारी शिक्षक अशोक येरमे यांना पारोमिताबद्दल सांगितले होते. आदिवासींचे काही प्रश्न असतील, तर सांग. पारोमिता मदत करू शकते, असे सांगितले. सामाजिक कामे करणारी कोणती तरी तरुणी मूलमध्ये आली आहे, याची खबर राजोलीच्या नवभारत शाळेतील गुरुदास येरमे यांनाही कळली. त्यातच गोपाळाच्या अटकेचे वारे पंचक्रोशीत पसरले होते. गुरुदास येरमे यांनी शाळेतील फोनवरून पारोमिताशी संपर्क केला. गावातील घटनेची हकीगत सांगितली. अर्धातासात माहिती घेऊन सांगतो, असे पलीकडून उत्तर आले. अशोक येरमे हे गोपाळाच्या अटकेची कागदपत्रेच घेवून पारोमिताकडे गेले. ते वाचून धक्काच बसला. आचारासंहितेचा भंग केल्याप्रकरणी त्याला अटक केल्याचे दाखविले होते. गोपाळाच्या प्रकरणाचे निवडणूक उमेदवार किंवा कुठल्या राजकीय पक्षाशी संबंधही नव्हते. मात्र, त्यावर तहसीलदारांनीही डोळेझाकपणे सही केली होती. निवडणुकीच्या काळात गोपाळामुळे तर काही अनुचित घडले नव्हते, तरीही पोलिस प्रशासनाने अटक केली. तेव्हा पारोमिता युनिसेफमध्ये काम करीत होत्या. त्यांच्याकडे कारागृह निरीक्षणाची जबाबदारी होती. जेलमध्ये भेट दिली. त्या तेव्हाचे कलेक्टर के. बी. भोगे यांच्याकडे गेल्या. एका निर्दोष व्यक्तीवर चुकीचा गुन्हा नोंदविल्याची कैफीयत मांडली. त्यांनीही ते समजून घेतलं. पुढील दोन दिवसांतच गोपाळा जेलमधून सुटला. गावी गोपाळाला घेऊन पारोमिता येणार असल्याची वार्ता पसरली. त्यांना गावापर्यंत आणण्यासाठी गुरुदास येरमे राजोलीच्या बसस्थानकावर दुपारी १२ वाजेपर्यंत आपली स्कुटर घेऊन वाट बघत होते. पण, पारोमिता आणि विजय सिद्धावार हे मूल बसने थेट सरडपार येथे उतरले. पुढे बस नसल्यामुळे चार किलोमीटर पायी जावं लागलं. दगड मातीचा रस्ता आणि भोवती घनदाट जंगल होतं. वस्तीत शिरत असताना फक्त झाडांची काहीशी सळसळ आणि पक्ष्यांचा तितका आवाज कानी पडत होता. काळजाचा ठोका चुकत होता अन तासाभरातच गवताच छपरं घातलेलं गाव दिसलं. हे गाव होते चिटकी. ३०-४० घरांच्या गावात आदिवासी समाजासह कोहळी, धीवर, दलित आदी समाज. गावात एक तरुण मुलगी आणि मुलगा येत असल्याचे बघून गावकऱ्यांना कुतूहल निर्माण झालं होतं. ते नक्षलवादी तर नाही ना, असा कयास काहींनी लावला. गोपाळा परत आल्याचे बघून गावात आनंद पसरला होता. मनोहर येरमे यांच्या घराच्या व्हरांड्यात सभा बसली. ही कोण बंगाली मुलगी आपल्या गावात आली असे म्हणून अनेकजण येरमेच्या घरी गर्दी करीत होते. त्यांच्याशी चर्चा झाली. त्यांनी आपल्या समश्या मांडल्या. पोलीस पाटील ऐकत नाही. तलाठी पैसा खातो, फारेस्टवाले त्रास देतात. पोलिसही पिळवणूक करतात. महिलांनीही आपल्या समस्या मांडल्या. त्यांचे हक्क, कायदा, देशाचे संविधान त्यांना पटेल त्या भाषेत पारोमिता समजावून सांगत होत्या. पण, या समस्या सोडविण्यासाठी एक संघटना काढायला हवी, असा सूर निघाला. गावातील बायकांनीही पाठिंबा दिला. परतीच्या वेळी संध्याकाळ झाली होती. त्यामुळे तिथेच मुक्काम केला. गावातील आदिवासी महिलांनी सादर केलेले गीत ऐकून पारोमिताच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. त्यांनी आदिवासी संस्कृतीची माहिती जाणून घेतली.

पुढे एक-दोन बैठकी झाल्या. चिटकीसह घोट, मुरपार, गोविंदपूर या गावातील लोक एकत्र आले. काहीजण गावोगावी फिरून संघटना स्थापन करण्यासाठी जनजागृती करीत होते. दलित, शोषित, पीडित, कामगारांचे प्रतिनिधीत्व करणारा "श्रमिक" शब्द संघटनेत ठेवण्याचे एकमत झाले. तर त्यापुढे एल्गार हा शब्द लावण्यात आला. एल्गार हा शब्द सुरेश भटांच्या गजलेतून घेण्यात आला. मुंबईत विवेक पंडीत यांच्यासोबत सामाजिक काम करीत असताना पारोमिता मराठी शिकल्या होत्या. त्या सुरेश भटांच्या चाहत्या झाल्या. साध्याच माणसांचा एल्गार आहे, थोर गांडुळांचा भोंदू जमाव नाही, याच गझलमधून एल्गार हे नाव संघटनेमध्ये लावण्यात आले. अशारितीने एका संघटनेच्या जन्मानंतर नामकरणही झाले.

### श्रमिक एल्गारचा पहिला लढा

चिटकी येथील गोपाळा गावडे याची जेलमधून सुटका झाल्यानंतर सिंदेवाही तालुक्यातील अनेक गावे पारोमिता गोस्वामी यांच्याशी परिचित झाली. आपले प्रश्न सोडविण्यासाठी कुणीतरी धावून येत असल्याचे ध्यानात आले. लोक संघटीत होऊ लागली. श्रमिक एल्गारच्या स्थापनेनंतर पहिला लढा उभारण्यात आला. त्यावेळी गावात मातीच्या तेलाची समस्या होती. अधिकच्या दराने तेल विकले जायचे. हा प्रश्न लोकांनी सभेत मांडला. यावर न्याय मिळावा म्हणून सिंदेवाही येथे मोर्चा निघाला. सिंदेवाहीसह चिटकी, घोट, मुरपार, गोविंदपूरचे लहान लेकरांसह 82 जण सहभागी झाले. सिंदेवाही- नागपूर मार्गावर रस्ता रोखून धरण्यात आला. ठाणेदार भलावी यांनी पोलिस कुमक पाठवून सर्वांना अटक करणे सुरू केले. गाडीत भरणे सुरू केले. लहान लेकरांनाही त्यांनी डांबले. अजाणतेमुळे या मुलांना पोलिसांची भिती वाटत नव्हती. त्यामुळे ही मुले वाहनातून उतरून पुन्हा रस्त्यावर येवून बसायची. सिंदेवाहीच्या पोलिस ठाण्यात एक दिवस ठेवण्यात आले. दुस-या दिवशी स्पेशल एसटीने या सर्वांना चंद्रपूरला नेण्यात आले. पण, तिथे त्यांना जागा मिळाली नाही. मग, नागपूरला हलविण्यात आले. तिथे बायका माणसांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले. राधाबाई, शांताबाई, मिराबाई, सूमनबाई आदी महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, दागिणे, पैसे महिला जेलरने जमा केले होते.

जाडवाली भाकर, मोठ्या मोठ्या फोड्यांची कोहळयाची भाजी, वरण पाणी खावून जेलमध्ये दोन दिवस काढले. इकडे गुरदास येरमे आणि अरविंद चैधरी हे सर्वांना जेलमधून सोडविण्यासाठी प्रयत्न करीत होती. 82 जण जेलात गेल्याने आंदोलनकर्त्या गावात शांतता पसरली होती. पुढे काय होईल, याचीच चिंता लागली होती. पारोमिता जेलमध्ये असल्याची माहिती मुंबईतील त्यांचे सामाजिक कार्यातील सहकारी विवके पंडित यांना कळली. त्यांनी नागपूर गाठले. रुपाताई कुळकर्णी, सादिक भाई आदी चळवळीतील व्यक्ती आदिवासी माणसांसाठी जेलमध्ये आलीत. पारोमिताताईंशी चर्चा केली. त्यांनी सर्वांची सुटका करुन दिली. गुरुदास येरमे, अशोक येरमे आदी मंडळी हजर होती. जेलच्या लोखंडी सलाखींबाहेर प्रवेश करताच हारतुरं घालून सर्वांचे स्वागत करण्यात आले. तीन दिवस जेलमध्ये दिवस काढल्यानंतरही कुणीही खचला नाही. उलट सर्वांच्या चेह-यावर उत्साह संचारला होता. आणखी नवा जोश घेउन ट्रॅव्हल्सने सिंदेवाहीकडे परतली. गावक-यांची विनाकारण पिळवणूक करणा-या ठाणेदार भलावीची तातडीने बदली झाली. पोलिस प्रशासन हादरलं होतं. चार- पाच दिवस गेल्यानंतर सिंदेवाहीत रॅली काढण्यात आली. झिंदाबाद लिहलेले फलक घेऊन कार्यकर्ते लोकांना संघटित करीत होते. चिटकीत पहिली गाव कमेटी स्थापन करण्यात आली. त्या पहिल्या कमेटीचे पहिले अध्यक्ष होते रामकृष्ण नारायण कुळमेथे, तर मीराबाई कन्नाके या पहिल्या सदस्य झाल्या.

एल्गारचे नाव घेतले की शासकीय अधिकारी जातीने लक्ष देऊन कामे करू लागली. समस्त जनता पारोमिताला एल्गारबाई म्हणू लागली. ऐकेकाळी काळोख पसरलेल्या आणि प्रशासकीय यंत्रणेला घाबरून अंधकारमय जीवन जगणा-या आदिवासी समाजाच्या आयुष्यात पारोमिता नावाची एक ज्योत पेटली. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, पीडित आणि असंघटित मजुरांच्या प्रश्नांना घेऊन एल्गारबाईची ही संघटना गावोगावी पसरली. मनातील भिती दूर झाली. गरिब माणूस ताठ मानेनं उभा राहिला. ताई म्हणजे आधार, ताई म्हणजे दिशा.... ही भावना प्रत्येकाच्या हृदयात निर्माण झाली. गरिब, आदिवासी, दीनदुबळ्यांच्या मनात आज 20 वर्षानंतरही ताईबद्दल प्रेम, आपूलकी, विश्वास आणि जगण्याची आशा कायम आहे. म्हणूनच ताई जेव्हा अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी जाण्यास निघायच्या तेव्हा बहिणींच्या डोळयात अश्रू दाटून यायचे. भावांचे चेहरे केविलवाणे व्हायचे. निरोपाच्या वेळी जड मनाने बाय-बाय करीत ताई पुन्हा परत येण्याची प्रतीक्षा करायचे. म्हणूनच पारोमिताई या सर्वांच्या आयुष्यातील एक शक्तीपीठ ठरल्या. उजव्या हाताची मूठ बांधून लढेंगे, जितेंगे आणि झिंदाबाद शब्दातून संघटनेची एकजूट आणि ताकद दर्शविली जाते.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

देवनाथ गंडाटे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला व्यसनमुक्तीचे विचार दिले. महाराजांचे ग्रामस्वच्छतेचे विचार राज्य शासनाने स्वीकारून राज्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले. महाराजांच्या दारूबंदीचे विचार राज्य शासनाने स्वीकारून त्यांच्या कर्मभूमीत दारूबंदी जाहीर करावी, यासाठी श्रमिक एलगारने क्रांतिभूमी चिमूर ते विधानसभा नागपूर अशी पदयात्रा काढली. पारोमिता गोस्वामी यांच्या नेतृत्वात पुकारलेल्या "वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चंद्रपूर जिल्हा दारूबंदी अभियाना' ला चार हजार 805 कार्यकर्त्यांनी सहभाग दर्शविला.



सुरेखा तलांडे

चिमूर वरून नागपूर विधानसभेवर दारूबंदीसाठी महिलांची पदयात्रा निघाली. पाच दिवस चालत असल्याने या महिलांना भूक लागली असेल हे पाहून पोलीस आणि तिथे केळी वाटप करणे सुरू केले. ह्या केळी परत करत राजुरा तालुक्यातील सुरेखाबाई तलांडे यांनी पोलीस अधिकाऱ्याला बजावले. आम्ही दारूबंदी मागण्यासाठी आलो आहोत तुमच्या केळी खाण्यासाठी नाही!

# दारूबंदीचा ऐतिहासिक लढा

या आंदोलनाची खरी सुरवात 5 जून 2010 रोजी झाली. ज्युबिली शाळेत पहिली सभा झाली आणि पुढे सहा महिन्याच्या कालावधीत आंदोलनाची रणनीती आखण्यात आली. ५ डिसेंबर २०१० ला सकाळी साडेपाचला बालाजी मंदिर येथून पदयात्रा निघाली. अध्यक्षस्थानी प्रा. जयश्री कापसे-गावंडे होत्या. याप्रसंगी श्रमिक एल्गारच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. पारोमिता गोस्वामी, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश वारजूकर, जिल्हापरिषद सदस्य प्रा. दादा दहीकर, सुमनबाई टेकाम, कुमरे, विमल कोडापे, सुरेखा कुसराम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. मासिक सभेत चंद्रपूर जिल्हा दारूबंदीचा ठराव मांडून संमत करण्याकरिता प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन जिल्हापरिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश वारजूरकर यांनी दिले, ही देखिल जमेची बाजु ठरली.

श्रमिक एल्गारच्या पारोमिता गोस्वामी यांच्या नेतृत्वात राष्ट्रसंतांची कर्मभूमी चिमूर येथून पाच डिसेंबरला पदयात्रेला सुरवात झाली. भद्रावतीपासून तर जिल्ह्यातील सर्वच ठिकाणांहून एकत्र आलेल्यांनी दारूबंदीचे नारे देत पदयात्रा केली. भिसी मार्गावरून चिंचाळा या गावात पहिला मुक्काम झाला. महिला आपली पाच दिवसांची रोजीरोटी सोडून या पदयात्रेत सहभागी झाल्या.

चंद्रपूर जिल्ह्याच्या इतिहासात एवढ्या मोठ्या संख्येने नागपूरला पदयात्रा निघाली नव्हती. मात्र, श्रमिक एल्गारच्या पुढाकाराने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चंद्रपूर जिल्हा दारूबंदी अभियानाअंतर्गत निघालेली पदयात्रा ही ऐतिहासिक ठरली. या मागणीसाठी जिल्ह्यातील तब्बल पाच हजार कष्टकरी महिलांचा मोर्चा अनेक दिवसांची पायपीट करीत विधानभवनावर गेला होता. अनेक महिला तर अनवाणी पायाने चालल्या. पायाला फोड आलीत. काहींच्या प्रकृती बिघडल्या. वेदना विसरून त्या चालत राहिल्या. दिवसभर, रात्री गावात प्रबोधनाचे कार्यक्रम घेत जनजागृती करायचे. उघड्यावरच मुक्काम ठोकायचे. पाच दिवसांचा या प्रवासाने अनुभवांची शिदोरी मिळाली. चिमूर ते नागपूर 130 किलोमीटरचे अंतर पदयात्रेतून पार करणाऱ्या महिलांच्या चेहऱ्यांवर लढ्याचा आनंद होता. प्रवीण चिचघरे, यमराज बोधनकर, नीलाबाई ठाकरे, कपिला भसारकर, माधुरी तोरे, संगीता गेडाम या पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या. 10 वर्षांच्या चिमुकल्यापासून 70 वर्षांच्या पार्वताबाई सिडाम, मीराबाई गावतुरे, शांताबाई कोसरकर, पार्वताबाई व्याहाडकर, रुकमाबाई लोनबले व वल्लुबाई सीमोनकर, मोहुर्ले, धृपता नैताम यांच्यासह अनेक वृद्ध महिला धडाडीने या पदयात्रेत सहभागी झाल्या. 130 किलोमीटर अंतर पार करीत नागपुरात पोचल्यानंतर नागपुरातील अनेक नागरिक मदतीसाठी पुढे आले. दु:ख, वेदना, थंडी व अचानक आलेला पाऊस यातही हे पाच दिवस कसे गेले हे समजलेच नाही, असा अनुभव आंदोलनकर्त्या सांगत होत्या.

बल्लारपूर तालुक्याततील मानोरा येथील श्रमिक एल्गारचा कार्यकर्ता सूर्यकांत हा चार डिसेंबरला पदयात्रेत सहभागी होण्याकरिता चिमूरला होता. याच दिवशी त्याच्या पत्नीला मुलगा झाल्याची बातमी त्याला कळली. आनंद झाला. मात्र, तो माघारी गेला नाही. याच पदयात्रेत मुलगा झाल्याचा आनंद पेढे वाटून साजरा केला. संपूर्ण पदयात्रेची सांगता झाल्यानंतरच तो गावाकडे परतला.

भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दारूबंदीविषयी अशासकीय विधेयक सभागृहात मांडले. विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात होत असलेल्या दारूबंदीच्या मागणीकडे सभागृहाचे लक्ष वेधले. चंद्रपूर जिल्ह्यात संपूर्ण दारूबंदी लागू करण्याच्या होत असलेल्या मागणीवर आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने दारूबंदीवर झडलेली चर्चा अतिशय भावनिक पातळीवर गेली. महसुलाचा अट्टहास सोडून शासनाने सर्वत्र दारूबंदीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन अनेक आमदारांनी चर्चेच्या निमित्ताने केले.

जिल्ह्यातील सर्व दारूचे परवाने रद्द करून दारूबंदी करावी, या मागणीवर विचार करण्यासाठी विशेष समिती नेमली जाईल, अशी घोषणा उत्पादनशुल्क राज्यमंत्री



दारूबंदीच्या मागणीसाठी वरोरा येथे तत्कालिन पालकमंत्री संजय देवतळे यांच्या निवासस्थानासमोर मुंडण आंदोलन करताना.

राजेंद्र मुळक यांनी विधानसभेत केली. हे श्रमिक एल्गारच्या आंदोलनाने यशाचा पहिला माईलस्टोन गाठला होता. दारूच्या झळा सोसलेल्या सामान्य महिला आपल्या व्यथा तिथे मांडत होत्या. ॲड. पारोमिता गोस्वामी, डॉ. राणी बंग यांनी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना मागणी समजावून सांगितली . तेव्हा मुख्यमंत्र्यांनी त्यांना 2 महिन्यात निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. चंद्रपूर जिल्ह्यातील महिलांच्या तीव्र आंदोलनाची दखल घेत तत्कालिन पालकमंत्री संजय देवतळे यांचे अध्यक्षतेखाली राज्य सरकारने दारूबंदीची शिफारस करण्यासाठी समिती नेमली. त्यामुळे दारू विक्रेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली.

वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी करण्यात आली. मात्र, तिथे आज सर्वाधिक अवैध दारू विकली जाते. मग दारूबंदीचा उपयोग काय? संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी करा, अशी मागणी दारूविक्रेत्यांनी शासनाकडे केली. जिल्ह्यात दारूबंदीचे आंदोलन जोरात असताना त्याला विरोध करण्यासाठी दारूविक्रेत्यांसह या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारोंच्या गर्दीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा निघाला. त्यांनी आपल्या भावना शासनदरबारी मांडल्या. दारूबंदीची झाल्यास जिल्ह्यातील दारूविक्रेते व या व्यवसायावर अवलंबून असलेले कामगार आपल्या कुटुंबासह रस्त्यावर येतील, असा युक्तिवाद करीत दीपक जैस्वाल यांच्या नेतृत्वात दोनदा मूक मोर्चा काढण्यात आला.

चंद्रपूर जिल्ह्यात शासनमान्य 109 देशी दारू दुकाने, 24 वॉईन शॉप, 320 वॉईन बार व 10 बियर शॉपी होती. या व्यवसायावर तब्बल 40 हजार कुटुंबे अवलंबून आहेत. जिल्ह्यात दारूबंदी झाल्यास या सर्व कुटुंबांवर बेरोजगारीचे संकट कोसळेल. परिणामी हे सर्व कामगार अवैध व्यवसायात गुंतून वाईट मार्गाकडे वळतील, अशी कारणेही या निमित्ताने पुढे आली. जिल्ह्यातील देशी व विदेशी दारूच्या माध्यमातून शासनाला 260 कोटी रूपयांचा महसूल मिळतो. यात दरवर्षी 10 टक्क्यांनी वाढ व्हायची. जर दारू दुकाने बंद झाली तर शासनाला दरवर्षी मिळणारा हा महसूल बंद होइल, असाही युक्तीवाद करण्यात आला. जर शासनाला दारूबंदी करायची असेल तर अवघ्या महाराष्ट्रात दारूबंदी करावी किंवा दारूचे कारखाने बंद करावे, अशी मागणीही चंद्रपूर जिल्हा लिकर असोसिएशनतर्फे जयस्वाल यांनी केली.

बंदी आणि बंदीच्या मागणीचा विरोध असे दोन गटवाद सुरु झाले. समितीने या दोन्ही घटकाची बाजू ऐकून घेतली. समितीत संजय देवतळे, समाजसेवक डॉ. विकास आमटे, व्यंगचित्रकार प्रा. मनोहर सप्रे, साहित्यिक मदन धनकर, प्राचार्य जे. ए. शेख, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांचा सामावेश होता. प्रारंभी 3 महिने आणि त्यानंतर 3 महिने मुदत वाढ घेतल्यानंतर समितीने अहवाल सादर केला. 15 मार्च 2013 रोजी राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी अहवालाची छाननी सुरु असल्याचे सांगितले होते. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न विधानसभेत लावून धरला. चंद्रपूर जिल्हयातील 847 पैकी 588 ग्रामपंचायतींनी दारूबंदीचा ठराव केला असल्याचे दारूबंदी समितीच्या अहवालात नमुद असल्याची माहिती लेखी उत्तरात राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी दिली होती. मात्र, दोन अडीच वर्षे उलटून गेल्यानंतरही जिल्ह्यात दारूबंदी करण्याच्या मागणीबाबत समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालावर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे "दारू दुकाने हटलीच पाहिजे दारूची बाटली फुटलीच पाहिजे " अशा घोषणा देत पुन्हा आंदोलन सुरु करण्यात आले. चंद्रपूर जिल्हा दारूमुक्त करण्याचा निर्णय एका महिन्यात घेण्यात येईल , असा शब्द मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिला होता. परंतु एका महिन्यात नाहीच नाही, तब्बल चार वर्ष उलटूनही दारूबंदी झाली नाही . त्यामुळे चंद्रपुरात आंदोलकर्त्यांनी सत्याग्रहाची शपथ घेतली.

26 जानेवारीला चंद्रपुरात जेलभरो आंदोलन केले. त्यात तिनशेवर महिला व पुरूषांनी स्वतःला अटक करुन घेतली. ॲड. गोस्वामी व त्यांच्यासह अटक केलेल्या 97 महिलांना नागपुरातील मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले. 87 पुरूषांना चंद्रपुरातील कारागृहात ठेवण्यात आले होते. येत्या एक महिन्यात दारूबंदीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येईल, असा निरोप पाठविला. त्यानंतरही निर्णय झाला नाही. 2014 मध्ये लोकसभा निवडणूक सुरू असताना श्रमिक एल्गारच्या महिलांनी नेत्यांच्या सभेमध्ये गोंधळ घालणे सुरु केले. पालकमंत्री संजय देवतळे यांच्या एका कार्यक्रमात धुडघूस घालण्यात आला. एकूणच या आंदोलनाला वेळोवेळी वेगवेगळ्या पद्धतीने उग्र रूप देण्यात आले. पण, शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे आंदोलनकर्त्या महिलांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली आणि चक्क 22 महिलांनी डोक्यावर केसच कापून टाकण्याचा निर्णय घेतला. 16 ऑगस्ट रोजी जिल्ह्यात दारूबंदी लागू न करण्याच्या विरोधात मुंडण करुन सरकारचा निषेध केला.

सरकारला 13 ऑगस्ट ही शेवटची मुदत दिल्यानंतरही दारूबंदीची घोषणा करण्यात आली नाही. त्यामुळे वरोरा शहरातील महात्मा गांधी चौकात श्रमिक एल्गारच्या अध्यक्ष पारोमिता गोस्वामी यांच्यासह 22 महिलांनी मुंडण करून दारूबंदीसाठी पुन्हा एकदा एल्गार पुकारला.

दारूबंदीबाबत समितीचा अहवाल तपासून या जिल्ह्यात लवकरच दारूबंदीचा निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी दिल्यानंतर दारुबंदी तीन टप्प्यात करण्याची सूचना विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी दिली होती. सा-या सूचना, आश्वासने देवूनही ठोस निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे आंदोलनकर्त्या महिलांनी विधानसभा निवडणुकीत दारुबंदी न करणाऱ्या शासनाविरुद्ध अर्थात त्या राजकीय पक्षाविरुद्ध प्रचार सुरू केला. बल्लारपूर, वरोरा, राजुरा मतदार संघात दारुबंदीला पाठिंबा देणाऱ्या उमेदवाराला समर्थन देण्यात आले. सुधीर मुनगंटीवार हे आधीपासूनच या महिलांच्या बाजूने होते. त्यांनी भाजपची सत्ता आल्यास दारुबंदी करू, असे ठोस आश्वासन दिले होते. नोव्हेंबर 2014मध्ये विधानसभा निवडणूक झाली. राज्यात भाजपची सत्ता आली. विशेष म्हणजे दारुबंदीच्या लढ्याला मोठा पाठिंबा देऊन आमदार सुधीर मुनगंटीवार राज्यमंत्रीमंडळात अर्थमंत्री झाले. "दिलेला शब्द पाळायचाच असतो' हे बीद्र घेऊन समाजकारण आणि राजकारण करणाऱ्या सुधीरभाऊंनी अवघ्या महिनाभरात दारुबंदी करू अशी पुन्हा घोषणा केली. त्यामुळे दारुविक्रेते पुन्हा हादरले. नागपूरात डिसेंबर 2014चे हिवाळी अधिवेशन सुरू झाले होते. तेव्हा एकाच दिवशी दारुबंदी आणि दारुबंदीचा विरोध अशी मागणी करणारी दोन मोर्चे निघाली. मात्र, सुधीरभाऊंनी दिलेला शब्द पाळायचाच ठरविल्याने बंदीची घोषणा तितकी बाकी होती. आज उद्या दारुबंदीची घोषणा होईल, या आशेवर गेल्या साडेचार वर्षांपासून आस बसलेल्या महिलांना खरा आनंद झाला तो 20 जानेवारी 2015 रोजी. मकरसंक्रातीच्या पाच दिवसांत 'गोड गोड खा अन् गोड गोड बोला' म्हणत भाऊंनी जिल्ह्यातील महिलांना संक्रांत भेट दिली.

चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीची मागणी आणि त्यासाठी सुमारे साडेचार वर्षे आंदोलन चालले. पदयात्रा, रस्ता रोको, जेलभरो इतकेच काय तर महिलांचे मुंडण हे या आंदोलनाचे महत्त्वाचे ठप्पे ठरलेत. 5 जून 2010 पासून सुरू झालेल्या या आंदोलनाला आता 20 जानवोरी 2015 रोजी यशस्वी रूप आले. आता ही दारुबंदी प्रत्यक्षात एक एप्रिल २०१५ पासून सुरु झाली आहे.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

अतुल पेठकर

# पारोमिता गोस्वामी नावाची दुर्गा



चंद्रपुरातली दारूबंदी चळवळ म्हटलं की समोर येतं एकच नाव. पारोमिता गोस्वामी. शेतमजूर, कामगार महिलांच्या आवाजाला पार दिल्लीपर्यंत पोहोचवणाऱ्या या आधुनिक दुर्गेचं हे मनोगत.

माझं मूळ गाव कोलकाता. जन्मही तिथलाच. वडील प्राणगोपाल गोस्वामी लष्करात कर्नल, तर आई सुनीता शिक्षिका. आईवर बौद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव. आईचा त्याविषयीचा अभ्यासही चांगला. बोधिसत्त्वाचा बुद्ध होण्याच्या प्रवासातील दहा पायऱ्या म्हणजे पारोमिता. म्हणून माझं नाव पारोमिता. व्यासंग आणि लढाऊ बाणा वारशातच मिळालेला. १९९५मध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून एमए केलं. तिथेच पूर्व विदर्भाविषयी माहिती मिळाली. एमए झाल्यानंतर चार वर्षं ठाणे जिल्ह्यात श्रमजीवी संघटनेत काम केलं. नंतर थेट चंद्रपूर गाठलं.

या देशाच्या संविधानाने आपल्याला सन्मानाने, हक्काने जगण्याचा अधिकार दिलाय. संघटना बांधणीचा अधिकार दिलाय. मग चॅरिटी कशाला या विचारातून श्रमिक एल्गारची नोंदणी ट्रेड युनियन ॲक्टखाली झाली. त्यामुळे लीगल स्टेटस पाहिलं, तर ही संस्था नाही संघटना आहे. 'इट इज अ युनियन.' सुरुवातीला १३१ सभासद होते आज २५ हजार कार्यकर्ते आहेत. चंद्रपूर, गडचिरोलीतील महिला, दलित, आदिवासींनी संघटनेला वाढवले.

लोक उभे राहिले पाहिजेत आपल्या हक्कासाठी, म्हणून हा लढा उभा केला. भारतीय संविधान जगातील सर्वात उदार आणि सर्वव्यापी आहे. फक्त आपलं संविधान लोकांच्या आयुष्यात दिसलं पाहिजे, विशेषत: गरिबांच्या आयुष्यात, शेतकरी, शेतमजूर, महिलांच्या आयुष्यात दिसलं पाहिजे. संविधान फक्त कागदावर नको, फक्त वकिलांच्या केसेसमध्ये नको, फक्त न्यायाधीशांच्या खंडपीठावर नको, रोज दिसलं पाहिजे. रोज जगताना लोकांना वाटलं पाहिजे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे संविधान माझ्यासाठी लिहिलं आहे. संविधान जिवंत करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. कारण आम्हाला वाटतं, ग्रामीण भागात वावरताना असं जाणवतं की, संविधान फक्त कागदावर राहिलं. ते लोकांच्या आयुष्यात उतरलं नाही. म्हणून लोकांचा आवाज ऐकू आला पाहिजे. लोकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा मुंबई, दिल्लीपर्यंत पोहोचल्या पाहिजेत आणि त्यावर काही तरी अंमलबजावणी झाली पाहिजे. त्या आवाजाचं स्वागत झालं पाहिजे. आणि हेच काम आम्ही करत आहोत. श्रमिक एल्गार संघटना हाच लढा देत आहे.

संघटनेत माइलस्टोन महत्त्वाचे आहेतच. पण दैनंदिन कामही तितकंच महत्त्वाचं आहे. गडचिरोलीत चिन्ना मट्टामी नावाच्या माडिया आदिवासी तरुणाला पोलिसांनी मारलं तेव्हा श्रमिक एल्गार उभी राहिली. चिन्नाच्या आईला हायकोर्टापर्यंत आणलं. ती पहिली माडिया बाई जी हायकोर्टात आणि विधानभवनात गेली. हायकोर्टाने चार दिवस फक्त चिन्ना मट्टामीचे प्रकरण ऐकलं. न्यायाधीशांनी अंतरिम स्थगनादेश दिला व त्याच्या आईची बाजू उचलून धरली. त्या वेळी मला असं वाटलं, खरोखरच काही तरी संविधान आहे, लोकांना न्याय देऊ शकते. हा एक माइलस्टोन होता. आणि असे किती तरी माइलस्टोन आहेत. आम्ही पाचशे आदिवासींना त्यांच्या जमिनी मिळवून दिल्या, निराधार महिलांचे मोर्चे विधानभवनावर घेऊन गेलो. तेव्हा सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री होते. त्या काळात निराधार महिलांच्या योजनांत खूप काही समस्या येत होत्या. म्हणजे खूप विचित्र अटी त्यात होत्या. गरीब बाईला विधवा पेन्शन आणि म्हातारपणाला पेन्शन पाहिजे असेल तर तिच्याकडे अजिबात जमीन नको, अठरा वर्षांचा मुलगा, मुलगी असायला नको. थोडीशी कुडो दोन कुडोची जमीन असेल तरी अर्ज नाकारायचे. आणि मला आठवतं की, शिंदे यांच्यासमोर आमच्या पाच बाया गेल्या. त्या भांडत होत्या, त्या सांगत होत्या मुख्यमंत्र्यांना की, साहेब तुम्ही ऐका. आमच्या अशा अशा अडचणी आहे. मग साहेब सांगत होते की, नाही नाही हे होऊ शकत नाही, अडचण आहे. आमच्या तिजोरीत पैसे नाही, असं नाही, तसं नाही. याच्यामध्ये खूप घोटाळे आहेत. मग एका म्हाताऱ्या बाईने मुख्यमंत्र्यांना विचारलं की, आम्ही असं ऐकलं की आमदार, खासदारांना पेन्शन मिळते. हे खरं हाये का? त्यांनी हो सांगितलं. मग आमदारांना पेन्शन हाये, खासदारांना पेन्शन हाये, त्यांना कोणीच विचारीत नाही की, तुमची मुलं अठरा वर्षांची हाये का, तुमच्याकडे शेती हाये का, तुमच्याकडे जमीन हाये का, मग आम्हालाच कशाला विचारता हो तुम्ही? आम्ही किती दिवस शेती करणार. आणि मग शिंदे साहेब पाहतच राहिले तिच्याकडे. तिने सांगितलं, साहेब, आम्ही आयुष्यभर शेती करतो. मग तुमची काय इच्छा आहे? आम्ही शेतीच्या बांधावरच मरावं का? आणि मग नंतर त्या दोन अटी महाराष्ट्र शासनाने शिथिल केल्या. आज त्या अटी नाहीत. जेव्हा बाया बोलायला लागतात तेव्हा काही तरी बदल होतो, असा माझा अनुभव आहे. आणि म्हणून रोज महिला, शेतकरी, शेतमजुरांचा, आदिवासींचा आवाज शक्य तेवढा मजबूत करायचा हे श्रमिक एल्गारचं काम आहे.

मी चंद्रपूर जिल्ह्यात येण्याच्या आधीपासून दारूबंदीचा लढा सुरू होता. माझ्या आजीच्या वयाच्या बाया दारूबंदीसाठी लढत होत्या. मी फक्त केलं काय तर सर्व महिलांना एकत्र करून एकच आवाज इतका मोठा काढला की, चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी झाली. आज बाया खुश आहेत. स्वत: लढून, स्वत: जेल भोगून, पोलिसांच्या लाठ्या खाऊन आम्ही जी दारूबंदी मिळवली त्याचा जो अभिमान आम्हाला आहे, त्याचा जो आनंद आम्हाला आहे, तो सरकारच्या लाख योजनांनीही मिळाला नसता.

चंद्रपूर दारूबंदीनंतर विदर्भात अनेक ठिकाणी दारूबंदीसाठी मोर्चे निघाले. लढे सुरू झाले. पण मी या लढ्यांचं नेतृत्व करणार नाही. कारण तिकडे नेते उभे राहिले पाहिजे. साताऱ्यात हेरंब कुळकर्णी, बुलडाण्यात प्रेमलता सोनवणे, यवतमाळमध्ये संगीता पवार, नगरमध्ये ॲड. वर्षा देशपांडे चांगले काम करत आहेत.

मला असं वाटतं की, आज सामाजिक चळवळींना विनाकारण आरोपीच्या कठड्यात उभं करण्यात आलंय. सोशल मूव्हमेंट आरोपी आहे, फाइव्ह स्टार ॲक्टिव्हिस्ट म्हणून हिणवलं जातंय. परंतु सरसकट सगळ्यांना एकाच तराजूत तोलणं बरोबर नाही. फार दुर्दैवी आहे. मला असं वाटतं की, समाजात सामाजिक चळवळींचीही एक भूमिका आहे. चळवळीला एक स्थान आहे आणि सामाजिक चळवळ लोकशाही मजबूत करण्यासाठी काहीतरी योगदान देऊ शकते. त्यामुळे राजकीय नेत्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून चळवळीकडे पाहावं. अहिंसक चळवळींना प्रतिसाद मिळाला नाही, त्या अयशस्वी झाल्या, त्यातून न्याय मिळत नाही, अशी भावना झाली की, हिंसक चळवळींना जागा मिळते. राजकीय नेत्यांनी हे समजून घेऊन सामाजिक चळवळींना आरोपीच्या कठड्यात उभे न करता त्यांच्याशी सुसंवाद साधला पाहिजे.

अलीकडे सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनांकडे संशयाने पाहिले जाते. माझी विनंती आहे, कृपया असं करू नका. या संघटनांच्या मागे उभे राहा. काही वेळा विषय पटणार नसतील, कडवटपणा आणणारे असतील तरी समजून घ्या, निदान ऐकून तरी घ्या. त्या नंतर आरोप करा.

- नागपूर, (pethkaratul09@gmail.com)

जिवती तालुक्यातील नागापूर येथे झाडू कोडापे यांचे झोपडीत पारोमिता गोस्वामी सह कार्यकर्त्यांना पेटवून देण्याचा प्रयत्न झाला. या हल्ल्यातून त्या कशाबशा वाचल्या. तरीही त्यांच्यातील अंगार मात्र कमी झाला नव्हता. पोलीस गाडीत बसवीत असतानाच, मागे वळून जमावाला त्या बोलल्या, 'मी आज जात आहे परत सहा महिन्यात मी इथेच सन्मानाने येईल इंच न इंच जमीन घेईल. सहा महिन्यातच नागापूर येथे संविधान गौरव सभा घेण्यात आली. ज्या झोपडीत हल्ला झाला तिथून हजारो आदिवासी डोक्यावर संविधान घेत कार्यक्रमस्थळी आले. आणि संपूर्ण जमीन ताब्यात घेण्याचा संकल्प केला.

# निराधारांच्या अटी रद्द करण्यास भाग पाडले

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा येथे बैठक सुरू असतांना, एका सत्तर वर्षाच्या बाईने प्रश्न केला, 'बाई हे वय आहे काय माझा रोवणीले जाण्यांचा? हातपाय चालत नाही, डोय्यांन दिसत नाही, निराधारांचा पगार होता तो सरकारन बंद केला, पोरगी अठरा वर्षाची झाली. ते लगन करून सासरी गेली, तर मले कोण पोसन?' या प्रश्नाने सारेच अस्वस्थ झालेत. निराधारांना त्यावेळी 225 रूपये अनुदान दिले जायचे, त्यासाठी निराधारांना जमिन अथवा 18 वर्षाचे वर अपत्य नसावा अशी शासननिर्णयात अट होती.

या अटीमुळे तहसिलदारांनी तिला मिळणारे अनुदान बंद केले. शासननिर्णयाप्रमाणे तहसिलदारांचा निर्णय कायदेशीर होता. परंतू तिच्या परिस्थितीनुसार शासननिर्णय न्यायसंगत नव्हता. ज्या निराधार महिलांचा मुलगा, मुलगी अठरा वर्षाचे झाले, त्यांनी शिकू नये काय? त्यांनी शिक्षण सोडून निराधार आईसाठी काम करावे काय? आमदार- खासदारांना हजारो रुपयाची पेंशन विना अटी-शर्ती दिली जाते. त्यासाठी त्यांच्याकडे जमिन किती आहे? त्यांचे मुले किती वर्षाचे आहे? हे बघितले जात नाही. मग फक्त 225 रूपयाच्या अनुदानासाठी ऐवढया अटी-शर्ती निराधारांसाठीच का? असे असंख्य प्रश्न उपस्थित झाले. निराधारांना न्याय मिळवून देण्यांचा संघटनेच्या केंद्रिय कमेटीत ठराव झाला. त्यावेळी धानोरासह शेकडो निराधार महिलांना घेवून पारोमिता गोस्वामी या चंद्रपूरच्या शासकीय विश्रामगृहात गेल्या.

तिथे त्यावेळचे राज्यांचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आले होते. त्यांच्याकडे निराधारांची फिर्याद मांडण्यासाठी त्यांच्याजवळ कुणीही जाऊ देत नव्हते. शेवटी पारोमितांने पोलिसांचे बॅरेकेट खाली पाडले. पोलिसांचे कडे तोडून निराधार महिलांना सुशीलकुमार शिंदे यांच्यापुढे उभे करीत बोलल्या. साहेब, तुमचे मुले किती वयाचे आहेत? तुम्हाला शेती किती आहे? हे प्रश्न तुम्ही आमदारकीचे पेंशन पगार घेतांना स्वत:ला विचारता का? पेंशन पगार घेतांना जर तुम्हाला या अटी शर्ती नसतील तर, अशा जाचक अटी शर्ती या निराधार बायकांना का? पारोमिताचे प्रश्नाचे भाडीमारातच मुख्यमंत्री शिंदे यांनी अडचण समजून घेतली आणि विना अटी शर्तीसह निराधार योजना सुरू राहील, याची ग्वाही दिली.

मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी शब्द दिला. मात्र त्यांनी निराधारांची जाचक अट काढली नाही. अखेर नागपूर अधिवेशनात तब्बल 25 हजाराचे वर निराधार महिलांचा श्रमिक एल्गारने मोर्चा काढला, मुख्यमंत्री भेटत नाही, तोपर्यंत परत जाणार नाही, असा निर्धार केला, रात्री 8 वाजता मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदेनी निराधारांच्या अपत्यांची आणि जमिनीची अट काढण्यांचे व अनुदानात 50 रूपये वाढविण्यांचे जाहीर केले. त्यानंतरच मोर्चाची समाप्ती झाली. याच मोर्चात बोरचांदली येथील गोदूबाई कन्नावार ही वृध्द निराधार महिला मोर्चात मरण पावली. हे प्रकरण तेव्हाचे विरोधी पक्षनेते नारायण राणे यांनी विधानसभेत उपस्थित केला.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

विजय सिध्दावार

चंद्रपुरात काम करीत असताना पारोमिता गोस्वामी ना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने चंद्रपूर जिल्हा कारागृहात भेट देण्यासाठी सदस्य म्हणून नेमले. कारागृहातील कैद्यांना विशेषता महिला व मुलांना कायदेशीर मदत करण्याचे काम त्यांच्याकडे होते. एक दिवस त्यांचे लक्षात आले की वरोरा येथील पारधी टोल्यावर राहणाऱ्या काहि गरोदर महिला जेलमध्ये आहेत परंतु त्यांची बाजू मांडणारे कुणी नसल्याने त्यांना जमानत मिळाली नव्हती. पारोमिताने त्यांचे कागदपत्रे घेतली व पोलीस गरोदर कैदी महिलांना ज्या वाहानात बसलेले त्याच वाहनात पारोमिताही बसली. राजुराच्या कोर्टात गेली आणि कोर्टात या महिलांची बाजू मांडली. कोर्टाने या महिलांना जामीन देण्याचा आदेश दिला. परत याच गाडीवर बसून पुन्हा चंद्रपुरात आली.

# चिन्ना मटामी प्रकरण

गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील मरकनार येथील 19 वर्षीय चिन्ना वत्ते मटटामी या युवकांची ही कहाणी आहे. आपल्या मित्रासह मासेमारी करण्यांसाठी गेलेल्या चिन्नाला पोलिसांनी ठार मारले. नंतर, पोलिसांनी चिन्ना हा नक्षलवादी असल्यांचे जाहीर केले. पोलिसांच्या या कृत्यामुळे, संपूर्ण गडचिरोली जिल्हयात संतापाची लाट उसळली. परंतू पोलिसांच्या कृतीला जाब विचारण्यांची त्यावेळी कुणाचीही हिमंत होत नव्हती. श्रमिक एल्गारने या प्रकरणात चिन्नाची आई, जब्बेबाई हिला न्याय देण्यांची सरकारकडे मागणी केली. दंडाधिकारी चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीने चिन्ना हा नक्षलवादी किंवा नक्षलसमर्थक नसल्यांचे तथ्य समोर आणले. मात्र पोलिसांचा गोळीबार समर्थनीय ठरविला.

याविरोधात जब्बेबाई, चिन्नाचा भाऊ पांडू मटामी आणि पारोमिता गोस्वामी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयात जाब मागणारी जब्बेबाई ही पहिली महिला माडीया ठरली. ही याचिका ऐतिहासिक ठरली. नागपूर उच्च न्यायालयाने तब्बल चार दिवस या प्रकरणाची सुनावणी घेत, पोलिसांच्या कारवाईवर ताशेरे ओढले. चिन्नाची आई जब्बेबाई हिला दोन लाख रूपये अंतरीम भरपाई आणि या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे दिला. सरकारने मात्र जब्बेबाईला भरपाई न देता, सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केले. येथेही श्रमिक एल्गारने लढा दिला. सर्वोच्च न्यायालयातही श्रमिक एल्गारचे बाजूने निकाल लागला. जब्बेबाईला शासनानी न्याय देण्यास भाग पाडले. श्रमिक एल्गारने हे प्रकरण, प्रसिद्धी माध्यमातून, विधीमंडळाच्या सभागृहातून, न्यायपालिकेतून सतत 7 वर्ष संघर्ष करून, हा लढा जिंकला.

याच प्रकरणात पोलिस अडचणीत आल्यांने त्यांनी, गडचिरोली जिल्हयातील 20 हजारावर आदिवासी युवकांचे 'सी नोट' भरून घेतले व त्यात त्यांच्याकडून बळबजरीने हे युवक नक्षलवादी/नक्षलसमर्थक आहेत असे लिहून, त्यांचे फोटो व सही अंगठे घेणे सुरू केले. पोलिसांची ही कृती कायदयांच्या विरोधात असल्यांने व आदिवासींचे संवैधानिक अधिकारांचे हनन करणारे असल्यांने, या विरोधातही उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. हजारो माडीया आदिवासींचे शपथपत्र श्रमिक एल्गारने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले, उच्च न्यायालयानी हे प्रकरण गांभीर्याने घेत, सर्व 20 हजार बेकायदेशीर सी नोट रद्द करण्याचे आदेश दिलेत आणि या सीनोटचा गैरवापर न करण्याची तंबी दिली.

चिन्ना मटामी प्रकरणाचे पडसाद राष्ट्रिय-आतंरराष्ट्रिय स्तरावर गाजले. यामुळे पोलिसांची नाचक्की झाली, त्यामुळे पोलिसांनी, श्रमिक एल्गार ही नक्षलवाद्यांची फ्रंट आर्गनायझेशन आहे आणि पारोमिता गोस्वामी या हार्डकोअर नक्षलवादी आहेत, असे शपथपत्र नागपूर उच्च न्यायालयात दाखल करून, पारोमिता गोस्वामी यांना पोटा कायदयाअंतर्गत अटकेची तयारी सुरू केली. मात्र, या प्रकरणातही उच्च न्यायालयाने श्रमिक एल्गारच्या बाजूने निर्णय देत, पोलिसांची दृष्ट मनसुबे हाणून पाडले.

### नक्षलवाद्यांची श्रमिक एल्गारला धमकी

श्रमिक एल्गार ही गांधी, तुकडोजीच्या विचारांवर श्रध्दा ठेवणारी संघटना आहे. त्यामुळे ही संघटना कायम हिंसेच्या विरोधात आहे. पोलिसांनी चिन्नाला मारून हिंसा केली. पोलिसाच्या हिंसेविरोधात श्रमिक एल्गारने ऐतिहासिक लढा दिला. पुढे काही दिवसानी, नक्षलवाद्यांनी भामरागड तालुक्यातील धोडराज येथील मंगरू पल्लो व इतर मजूर असलेल्या ट्रकवर बॉम्बस्फोट घडवून आणला. यात मंगरू पल्लो हा जागीच ठार झाला, तर काही युवक मजूर गंभीर जखमी झालेत. कुणाचे हात तर कुणाचे पाय निकामी झालेत. या हत्याची जबाबदारी सरकारने घ्यावी, मृतक मंगरूची विधवा बिच्चीबाई हिला व इतर जखमीना शासनाने भरपाई द्यावी, अशी मागणी केली. जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, नक्षलपीडितांसाठी असे कोणतेही धोरण नाही.

नक्षली हिंसेत बळी पडलेल्यांना स्थानिक साथ देत नाहीत. कारण त्यातून नक्षल्याकडून मदत करणाऱ्यांना धोका होण्यांची भिती असते आणि शासनही अशांना वाऱ्यांवर सोडत असल्यांने, या नक्षलपीडितांना शासनाने भरपाईचे धोरण जाहीर करावे, या मागणीसाठी नागपूर विभागीय आयुक्तांचे कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात नक्षलपीडित व नक्षलप्रभावीत भागातील आदिवासी मोठ्या प्रमाणावर सहभागी होत असल्यांचे पाहून नक्षलवादी खवळले, त्यांनी नक्षलवाद्यांचे मासिक 'प्रभात' मध्ये श्रमिक एल्गारच्या व पारोमिता गोस्वामीच्या विरोधात लेख लिहून, जीवे मारण्याची धमकी दिली. याच मजकुरांचे पत्रके गावा-गावात वाटून, नक्षलग्रस्त भागातील कुणीही या आंदोलनात सहभागी होऊ नये, यासाठी धमक्या दिल्या. श्रमिक एल्गारचे त्यावेळचे कार्यकर्ते दिलीप आगडे (सिंदेवाही, मृतक) व गोपाल मंडल (चंद्रपूर) यांचे नक्षलवाद्यांनी अपहरण केले. या कार्यकर्त्यांना स्थानिक मरकनार येथील श्रमिक एल्गारच्या महिला कार्यकर्त्यांनी सुखरूप सोडवून आणले. श्रमिक एल्गारने मात्र चंद्रपूर जिल्हयातील संघटनेच्या कार्यकर्त्यांना घेऊन, नागपूर विभागीय कार्यालयावर मोठे आंदोलन केले. त्यानंतर, नक्षलपीडितांसाठी शासनाने भरपाईचे धोरण जाहीर केले. श्रमिक एल्गारच्या लोकशाहीच्या लढ्याला यश आल्यांने पाहून, नंतर नक्षलवाद्यानी भामरगड तालुक्यातील श्रमिक एल्गारच्या दोन आदिवासी कार्यकर्त्यांची हत्या केली. श्रमिक एल्गार गडचिरोली जिल्हातील आदिसवासींत लोकशाही भावना रूजवितांना नक्षलवादी आदिवासी कार्यकर्त्यांची हत्या करीत असल्यांने श्रमिक एल्गारने या भागात 'थेट' काम करणे थांबविले.



चिन्नाची आई जब्बेबाई आणि त्याचा भाऊ पांडूसोबत पारोमिताताई.

### वेठबिगारी प्रकरण

मध्यप्रदेशातील विदीशा जिल्हातील गंजबसौदा येथे 165 सेहारीया आदिवासी कुटूंबियांना तेथील क्रेशर मालक दशकानुदशके वेठबिगार म्हणून राबवित असल्याची माहीती मिळाली. या आदिवासींना स्वत:चे घर नाही, गाव नाही. ते कायम एका मालकांकडून दुसऱ्या मालकांकडे विकत दिले जायचे. हे वेठबिगार त्या मालकांकडे सांगेल ते कामे करावी लागायची. श्रमिक एल्गारने या सर्व आदिवासींची वेठबिगारीतून सुटका करण्याचे ठरविले. श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा ॲड पारोमिता गोस्वामी, विजय सिध्दावार यांच्यासह मित्र संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गंजबसौदा येथे जावून, या सर्व मजूरांची क्रेशर मालकांचे तावडीतून सुटका करवून घेतली. या प्रकरणात ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले. पुढे मानवाधिकार आयोगाकडे याचिका दाखल करवून या सर्वांचे पुनर्वसन करण्यासही मध्यप्रदेश सरकारला भाग पाडले व आज तीथे 'आझाद नगर' नावांनी श्रमिक एल्गारच्या प्रयत्नानी, पारोमिता गोस्वामी यांचे हिमतीने मुक्त आदिवासी वेठबिगारांची वसाहत उभी आहे.

### संघटना बंद करण्याचे षडयंत्र

श्रमिक एल्गारचे प्रखर आंदोलन, आक्रमक आणि अभ्यासू भुमिकेमुळे राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर त्यावेळी प्रचंड खळबळ माजली. या संघटनेच्या माध्यमातून लोकांची प्रश्न सुटत असल्याने जनतेचा सहभागही वाढू लागला. यामुळे प्रशासनातील भ्रष्टाचार बाहेर येत असल्याने प्रशासकीय अधिकारी आणि श्रमिक एल्गारच्या आंदोलनामुळे राजकीय विजनवासात जाण्यांच्या भितीने राजकीय नेते कमालीचे संतप्त झाले. या सर्वांनी मिळून श्रमिक एल्गार बंद करण्यांचा षडयंत्र केला. या संघटनेत पहिल्या दिवसापासून सहभागी झालेले विजय सिध्दावार यांचे प्रिंटींग व्यवसायातील थकीत बिले देण्यांस मूल्च्या स्थानिक भाजपाच्या कार्यकर्त्यांनी नकार दिला. दिलेले कामही काढून घेतले आणि 'काकूला भेट' असे म्हणून कार्यकर्त्याची आर्थिकक बाजू कमजोर करण्याचा प्रयत्न केला.

गडचिरोली जिल्हयाचे तत्कालीन पोलिस अधिक्षक विनीत शर्मा यांनी श्रमिक एल्गारला नक्षलवाद्यांची फ्रंट आर्गनायझेशन असल्यांचा अहवाल तयार केला, तर चंद्रपूर जिल्हयातील वेठबिगारी प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या चंद्रपूर जिल्हयाचे तेव्हाचे जिल्हाधिकारी जे. पी. गुप्ता यांनी श्रमिक एल्गार ही असामाजिक तत्वासाठी काम करीत असल्याचा ठपका ठेवला. एकाच वेळी, आयबी, पोलिस, जिल्हाधिकारी यांनी दोन प्रकरणात, चॅरीटी कमिश्नर अशा पाच चौकशी लावल्या. यासाठी त्यावेळच्या माजी मंत्री शोभाताई फडणवीस यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्यात. वर्तमानपत्रांना हाताशी धरून बदनामीची मोहीमही सुरू केली. ही संघटना आणि या संघटनेच्या अध्यक्षा पारोमिता गोस्वामी या कशा नक्षलवादी आहेत, याबदल चर्चा, अफवा आणि बातम्या सुनियोजित पध्दतीने पेरण्यात आल्यात. गडचिरोलीचे पोलिस अधिक्षकांनी पारोमिता गोस्वामी यांच्यावर पोटा अंतर्गत कारवाईची सुरूवात करण्यात आली. मूल, सिंदेवाही, पाथरी, ब्रम्हपुरी येथील पोलिस स्टेशनमध्ये कार्यकर्त्यांच्या चौकशा सुरू झाल्यात. कार्यकर्त्यांच्या घरी जावूनही चौकशी करण्यात आली. सर्व तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांच्याकडून संघटनेच्या विरोधात अहवाल मागविण्यात आले. या संघटनेत लोक येवू नये, या दृष्टीने त्यावेळी सुनियोजीत पध्दतीने शासकीय आणि राजकीय यंत्रणा काम करीत होती.

चौकशी पूर्ण होण्यांच्या आतच जिल्हाधिकारी यांनी, श्रमिक एल्गारच्या देणगीदारांना पत्र पाठवून यापुढे या संघटनेला देणगी देऊ नये, असे कळविले. चंद्रपूरातून भाजपा समर्थीत एका वर्तमानपत्रात, "श्रमिक एल्गार ही असामाजिक तत्वासांठी काम करते, असे चौकशीत सिध्द झाल्यांच्या आशयाची बातमी दिली. या बातमीमुळे श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा पारोमिता गोस्वामी व कार्यकर्त्यांचे जीवाला समाजाकडून, पोलिसांकडून धोका होण्यांची भिती निर्माण झाल्यांने श्रमिक एल्गारने उच्च न्यायालयात धाव घेतली. या सुनावणीत सर्व तपासी यंत्रणानी त्यांच्या चौकशीत श्रमिक एल्गारला क्लीन चिट दिली तर, आयबीने आपल्या अहवालात स्पष्टपणे 'श्रमिक एल्गारच्या कार्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील गरीबांना खूप मदत मिळत आहे" असे निरीक्षण नोंदविले. हे सर्व पाहून उच्च न्यायालयानी जिल्हाधिकारी यांना हायकोर्टात उभे करून, ज्या संघटनेला शासनाने साथ द्यायला पाहिजे, अशा संघटनेची बदनामी कशाला करता असा जाब विचारताच त्यांनी, या सर्व चौकशा आमदार शोभा फडणवीस यांच्या सांगण्यावरून केल्यांचे मान्य केले आणि चुकीची माफी मागीतली.

गडचिरोलीचे पोलिस अधिक्षक, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी आणि त्यावेळी जिल्हयात राजकीय पॉवरफुल असलेल्या शोभाताई फडणवीस यांनी एकाचवेळी संघटनेच्या विरोधात घेतलेल्या भुमिकेमुळे आणि त्यावेळी संघटना जेम-तेम तीन-चार वर्षाची नवीन असल्यांने, ही संघटना मोडते की काय अशी शंका अनेकांना आली. मात्र मागील वीस वर्षात श्रमिक एल्गार सर्व प्रस्थापितांचा विरोध पत्करीत वंचितांचा आधार ठरत आहे.

श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

**पंकज मोहरीर**

सन 2003 मधील गोष्ट आहे त्यावेळी सिंदेवाही तालुक्यातील चिटकी मुरपारच्या बायांना घेऊन ब्रह्मपुरी एसडीओ ऑफिस मध्ये गेल्या. ब्रह्मपुरीचे एसडीओ त्यावेळी नुकतेच नोकरीवर रुजू झाले होते. पारोमिताचा ग्रामीण चेहरा, राहणीमान, सोबतच्या लुगड्यावाल्या महिला पाहून त्यांनी काम टाळण्यासाठी किंवा स्वतःचा रुबाब दाखविण्यासाठी इंग्रजी मधून बोलण्याचा प्रयत्न केला. पारोमिताने नंतर त्यांचे सोबत इंग्रजीमध्ये संभाषणाला सुरवात केली. पारोमिताची अस्खलित इंग्रजी ऐकल्यानंतर तो एसडीओ मराठीत बोलायला लागला. पण पारोमिताने इंग्रजीतच बोलणे कायम ठेवले. अखेर तो अधिकारी बोलला, 'मॅडम आप तो बहुत अच्छी अंग्रेजी बोलते हो लेकिन सॉरी मैं समझ नही पा रहा हू. प्लीज मराठी या हिंदी मे बोलिये. यानंतर अधिकारी श्रमिक एल्गार चे फोनवरही कामे करू लागले.

# लढा थांबलेला नाही!



नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सुटल्यानंतर जल्लोष करताना.

दारूबंदीसाठी झटणाऱ्या महिलांवर कुऱ्हाडीने वार झाले. विळ्याने बोट कापल्याच्या घटना घडल्या. त्यांच्या घरात नवरा जे-जे विकता येईल ते विकून दारूच्या आहारी गेला. संसार उघड्यावर पडला. लहान मुलेही काही भागात दारूच्या आहारी गेली. परवाने वाढतच होते. जिल्हा दारूमय होत होता. असेच होत राहिले तर जगणेच कठीण होईल, हे कळले. जिल्ह्यात दारूबंदीच करायची हा निर्णय पक्का झाला. तशी शपथ घेतली. तब्बल साडेचार वर्षांनंतर आज ती प्रतिज्ञापूर्ती झाली.

चंद्रपूर जिल्हा दारूबंदीसाठी महिलांचा लढा उभारणाऱ्या आणि प्रत्येक संघर्षात 'ती'च्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या नेतृत्वाचा हा अनुभव...

दारूबंदीचा लढा हा माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वपूर्ण संघर्ष म्हटला पाहिजे. ज्यात मी माझ्या सखींच्या भरवशावर या यशस्वी होऊ शकले. पण संघर्षाची ही गाथा आजही माझ्यापुढे जशीच्या तशी उभी आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी संघटनांसोबत काम केल्यानंतर 'युनिसेफ' या संस्थेच्या 'आमची शाळा' या प्रकल्पाच्या माध्यमातून चंद्रपुरात आले आणि कायमचे चंद्रपूरकर झाले. सामाजिक सेवेचे व्रत तसेच सुरू होते. त्याच अंतर्गत ऑगस्ट १९९९ मध्ये 'श्रमिक एल्गार' या संघटनेची स्थापना केली. पोलिस अत्याचार, चिन्ना मट्टामी प्रकरण, आदिवासींच्या जमिनीच्या पट्ट्याचा-रोजीरोटीचा प्रश्न, महिला अत्याचार असे अनेक प्रश्न हाताळले. प्रामाणिकपणे सांगते, तेव्हा जिल्हा दारूबंदीचा विचारही डोक्यात नव्हता. विविध महिलांच्या प्रश्नांसंदर्भात प्रश्न सोडविताना घराच्या चुलीपर्यंत जाऊन ग्रामीण महिलांच्या समस्या जाणून घेताना वेळेवेळी झालेल्या चर्चेतून अवैध दारूविक्री बंद करण्यासाठी मदतीची मागणी महिलांकडून होत होती. तेव्हा दारूसंदर्भातील पहिला लढा उभा झाला.

२००१ मध्ये चंद्रपूरपासून ४५ किलोमीटर अंतरावरील मूल येथे पोलिस स्टेशनवर 'अवैध दारू बंद करा' ही मागणी करणारा पहिला मोर्चा धडकला. यात विविध ठिकाणांहून आलेल्या दोन हजार महिला सहभागी झाल्या होत्या. पोलिसांसोबत महिलांच्या साक्षीने यानिमित्ताने संभाषण झाले. परवानाधारक मद्यविक्री दुकानातून सर्व नीतिनियम डावलून तस्करी केलेली दारू म्हणजे अवैद्य दारू असे स्पष्ट झाले. सर्व नियमांचे पालन करून दारूविक्री आवश्यक होती. पण तसे होत नव्हते. त्यातूनच तस्करीचे जाळे निर्माण झाले. जी दारूविक्री दुकानातून होते त्यापेक्षा कितीतरी जास्त विक्री सिंदेवाही पोंभुर्णा, नागभीड, मूल, वरोरा अशा अनेक गावांत होत होती. हे समाजाच्या दृष्टीने घातक होते. तेव्हा त्याविरोधात लढा सुरू झाला. अवैध दारू बंद करण्यासाठी गावात पोलिसांना सोबत घेऊन तरुणींचे संघटन उभारले. श्रीगुरुदेव सेवा मंडळ, शेषराव महाराज मंडळाच्या मदतीने काम सुरू केले. सर्वप्रथम पोंभुर्णा तालुक्यातील उमरी पोद्दार या आदिवासी गावात महिलांनी विनंती केली परवान्याचे दुकान बंद करण्यासाठी लढा दिला. ही साधारण २००६ मधली घटना. कायद्याचा अभ्यास करून महिलांचे शिबिर घेतले. त्यांना प्रशिक्षित केले. ग्रामसभेच्या माध्यमातून दारू दुकान बंद करता येईल, असे ठामपणे सांगितले. मग महिलांनी ग्रामसभेची मागणी केली. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामसभेच्या ठरावानंतर तो ठराव जिल्हाधिकाऱ्यांपुढे ठेवून पाठपुरावा केला.

जिल्हाधिकाऱ्यांनी त्याला मंजुरी दिली. सात दिवस दुकान बंद झाले. पण आठव्या दिवशी उत्पादन शुल्क आयुक्तांकडून या निर्णयाला स्थगिती दिली. आम्हाला वाटले हे कार्यालय नागपुरात असावे, पण ते मुंबईत होते. महिलांनी वर्गणी गोळा केली आणि या मुद्द्यावर त्या भांडल्याच. पाठपुराव्यानंतर अखेर स्थगिती हटली. दुकान मात्र बंद झाले नाही. त्याचवेळी ग्रामपंचायतीच्या निवडणुका घोषित झाल्या. आता महिलांनीच ही निवडणूक लढवावी असे ठरले. ग्रामपंचायतीने एकमताने ठराव झाला तर दारूचे दुकान बंद होऊ शकते म्हणून नऊ सदस्य असलेल्या याच ग्रामपंचायतीत साऱ्याच जागा महिलांनी जिंकल्या. गावात दारू दुकान नको म्हणून एकमताने ठराव केला. उमरी पोद्दाराचे दारू दुकान बंद केले. त्यापाठोपाठ चिचखेडा पाचगाव, घोसरी येथेही हा प्रयोग यशस्वी झाला. यातून एक मात्र कळले, आपण मुंबई, दिल्लीत जाऊन लढू शकत नाही. ही बाब अतिशय खर्चिक. दारूविक्रीवर स्थगिती आणली तरी विक्री सुरूच राहते. दुकाने तेवढी बंद होतात. परवाने रद्द होत नाहीत. उमरी पोद्दाराचे दुकान बंद झाले. पण मालकाने त्याच परवान्यावर वरोऱ्यात दुकान थाटले. ग्रामपंचायतीने ठराव करून दुकाने बंद होत नाही, हे उमजले. असाच अनुभव इतरही ठिकाणी आला.

२००९मध्ये घोसरी गावात दारूचे दुकान बंद करण्यासाठी महिला पुढे आल्या. मात्र २००८-०९ च्या नव्या शासकीय आदेशान्वये महिलांनी ग्रामसभेतून ठराव घेऊन होणार नाही. ग्रामसभेत ५० टक्के महिला ठरावाच्या वेळेस हजर राहिल्या पाहिजे तरच तो मंजूर होईल, असा निर्णय झाला. हे चुकीचे होते. दारूचे दुकान बंद झाले तर त्याला स्थगिती मिळू नये. ग्रामसभा सर्वोच्च असल्याने उत्पादन शुल्क विभागालादेखील त्याला स्थगितीचा अधिकार देऊ नये. सोबत दारू दुकान बंद करून ते स्थलांतरित केले जाऊ नये याबाबत शासनाला वारंवार निवेदने दिलीत. एकीकडे शासकीय उदासीनता तर दुसरीकडे दारूचा वाढलेला महापूर होता. महिलांचे उद्ध्वस्त होणारे संसार, तरुणांतील वाढत चाललेली व्यसनाधिनता, विस्कळीत झालेली लोकशाही डोळ्यांनी बघत होते. त्यातच सरकार दरवर्षी उत्पादनशुल्क विभागाला दारूवाढीचे वाढीव उद्दिष्ट देत होते. महसूल वाढवा हा त्यामागचा उद्देश होता. महसूलवाढीसाठी दारूला राजाश्रय मिळाला होता. आम्ही तोवर दारूबंदीची मागणी केली नव्हती. २००९ मध्येच घोसरी गावात जिल्हाधिकाऱ्यांनी महिला गुप्त मतदान करतील असे स्पष्ट केले. २० दिवस आधी याबाबतची घोषणा झाल्याने महिलांवर घरात मोठा अत्याचार झाला. या अत्याचाराचे वर्णनही करू शकत नाही! तुमच्या बायकांना घराबाहेर पडू देऊ नका, असे फर्मान दारू विक्रेत्यांनी काढले. एकदा मतदान न झाल्यास वर्षभर मतदान होणार नाही, असे स्पष्ट होते. दारूबंदीसाठी झटणाऱ्या महिलांवर कुऱ्हाडीने वार झाले. विळ्याने बोट कापल्याच्या घटना घडल्या. घरात नवरा जे-जे विकता येईल ते विकून दारूच्या आहारी गेले. संसार उघड्यावर पडला. लहान मुलेही काही भागात दारूच्या आहारी गेली. परवाने वाढतच होते. नागभीड तालुक्यातील पाचगाव येथील लोकसंख्या ३१६ पण तेथे दोन बियरबार. आणखी तीन देशी दारू दुकानांसाठी प्रयत्न सुरूच होते. गोंडपिपरी तालुक्यातील तारसागाव हे छोटे आदिवासी गाव. हजार लोकवस्तीच्या गावात दारूची पाच दुकाने. जिल्ह्याचा विचार करता ५०० दारूचे परवानाधारक, ५२ हजार पिण्याचे परवाने, शंभर व्यक्तींमागे एक दारूचे दुकान. आरोग्यसेवेचा विचार करता जिल्ह्यात ५६ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १३ ग्रामीण रुग्णालये. किती विरोधाभास? कसे होणार? जिल्हा दारूमय होत होता. असेच होत राहिले तर जगणेच कठीण होईल, हे कळले. जिल्ह्यात दारूबंदीच करायची हा निर्णय पक्का झाला. गुरूकुंज मोझरी येथे राष्ट्रसंतांच्या समाधीपुढे उभे राहून साऱ्यांनीच गंभीर वातावरणात शपथ घेतली, 'आम्ही कुठल्याही आमिषाला दडपणाला बळी पडणार नाही. आणि दारूबंदी घोषणा पूर्ण झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.' तब्बल साडेचार वर्षांनंतर आज ती प्रतिज्ञापूर्ती झाली.

आमच्या व्यथेची तीव्रता तेवढ्याच तीव्रतेने कळायला हवी. त्यासाठी जिल्ह्यातील पाच हजार महिलांना घेऊन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज दारूमुक्ती अभियानांतर्गत १० डिसेंबरला नागपूर येथील टी-पॉइंटवर पदयात्रा धडकली. सत्ताधारी-विरोधक आमदारांनी स्वागत केले. पंकजा मुंडे, यशोमती ठाकूर, प्रणिती शिंदे, मीनाक्षी पाटील या राजकारणी महिलांसह ज्येष्ठ समाजसुधारक डॉ. राणी बंग, गुरूदेवसेवा मंडळाचे बबन वानखेडे, प्रकाश वाघ यांचीही साथ महत्त्वाची ठरली. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी कार्यकर्त्यांना भेटी दिली. पण थकलेल्या आंदोलकांनी ती नाकारली. दारूबंदीची मागणी रेटली. पाटील यांनी महिलांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी भेट घालून दिली. त्याच दिवशी सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत अशासकीय ठराव मांडला होता. सरकारने या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी संजय देवतळे यांच्या नेतृत्वात समितीचे गठन केले. त्यात पुरुषच होते म्हणून महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी शोभाताई फडणवीस, विजया बांगडे यांच्यासाठी आग्रह धरला.

दारूबंदी संदर्भात १ लाख ६ हजार सह्यांचे निवेदन, ५४५ ग्रामसभेचे ठराव समितीला सादर झाले. तेथूनच सर्व स्तरातून दारूबंदीसाठी आग्रह होऊ लागला. २५ मान्यवरांनी वेगवेगळी पत्रे मुख्यमंत्र्यांना धाडली. यातच फेब्रुवारी २०१२ मध्ये तत्कालीन पालकमंत्री संजय देवतळे यांनी समितीचा अहवाल मुख्यमंत्री चव्हाण यांच्याकडे सादर केले. त्यानंतरही मुख्यमंत्र्यांकडून अर्थसंकल्पीय अधिवेशन संपले तरी कार्यवाही झाली नाही. महिलांनी 'वचनाला जागा' असे दुसऱ्या टप्प्यातील आंदोलन उभे केले. त्या माध्यमातून एक लाख पत्रे मुख्यमंत्र्यांकडे रवाना केलीत. २०१२ मध्ये हिवाळी अधिवेशनादरम्यान संघटनेतर्फे मोर्चा काढण्यात आला. आश्वासनापलीकडे महिलांच्या हाती काही आले नाही. धरणे, जेलभरो अशी आंदोलने यानंतरही झालीत. लोकसभेची निवडणूक संपताच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन पृथ्वीराज चव्हाण यांनी लोकसभा प्रचारादरम्यान दिले. पण ते हवेतच विरले. याचा निषेध म्हणून ऑगस्ट क्रांती अभियान राबविण्यात येऊन स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला माझ्यासह माझ्या २२ सखींनी मुंडण केले. सरकारी धोरणाचा निषेध नोंदविला. त्यावेळी या दुर्दैवी घटनेचा केवळ सुधीर मुनगंटीवार यांनी निषेध केला. अखेर विधानसभा निवडणुकीत सत्तेवर आल्यानंतर सर्वप्रथम जिल्हा दारूबंदीचे ठोस आश्वासन मुनगंटीवार यांनी पूर्ण केले. याचा मनापासून आनंद आहे. आता अंमलबजावणीसाठी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाताहेत. पण आमचे काम सुरू झाले आहे. मोहीम अजून थांबलेली नाही. शासनाला या कामात आमची मदत करण्याची तयारी आहे. एक एक गाव दारूबंदी करून घेण्यापेक्षा जिल्हा दारूबंदीचा विचार हा ज्या दिवशी आला तेव्हापासूनच हा लढा आणखी तीव्र झाला. गुरुदेव सेवा मंडळ, पोलिस यंत्रणा तसेच माध्यमांची साथही तितकीच महत्त्वाची ठरली. हा महाराष्ट्रातील कष्टकरी महिलांचा अभूतपूर्व लढा म्हणूनच म्हटला पाहिजे.

(महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रकाशित लेख.)

## मान्यवरांसह...




















श्रमिक एल्गार
मूल उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चा
१) निराधारांना २०००/- रु.पेंशन देण्यात यावे.
२) महसूल व वनविभागाच्या जागेवर असलेल्या जागेवर शेतकऱ्यांना पट्टे देण्यात यावे.
३) वनजमिनीच्या पट्ट्यासाठी गैर आदिवासींना लावलेली ३ पिढीची अट रद्द करण्यात यावी.
५) मूल व सावली तालुक्यातील ज्या गावात बस सेवा नाही त्या गावात बस सेवा सुरु करण्यात यावी.
दिनांक :-१६/०३/२०१८ रोज शुक्रवार
स्थळ :-श्रमिक एल्गार कार्यालय ताडाळा रोड,मूल ते उपविभागीय कार्यालय,मूल












## विविध पुरस्कार स्वीकारतांना...
















श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

**देवेंद्र गावंडे**

पारोमिता गोस्वामी चंद्रपुरात आल्यानंतर आमची शाळा प्रकल्प मध्ये काम करीत होत्या. त्यांचे लक्षात आले की ईरइ नदीला लागून असलेल्या स्मशानभूमी परिसरात खूप विद्यार्थी फिरत आहेत, ते शाळाबाह्य आहेत. पारोमिताने चौकशी केल्यानंतर लक्षात आले की, त्या परिसरामध्ये शाळा भरवण्यासाठी जागाच नाही. या मुलांना शिकविण्यासाठी तिने आमची शाळा प्रकल्प मधून एक शिक्षिका नेमून घेतली. आणि त्या स्मशानभूमीच्या चौथऱ्यावर शाळा सुरू केली. स्मशान भूमी वरील या आगळ्यावेगळ्या शाळेची दखल त्यावेळी युनिसेफने घेऊन चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव केला होता.

# लढाई जिंकूनच परत आली

एखादे काम हाती घेतले की त्याची तड लागेपर्यंत स्वस्थ बसायचे नाही हा कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये आवश्यक असलेला गुण पारोमितामध्ये ठासून भरला आहे. वेठबिगाराचे प्रकरण असो, आदिवासींच्या जमीनी परत मिळवून देण्याचा प्रश्न असो वा चित्रा मट्टामीचा लढा असो, पारोमिता व तिची संघटना न्याय मिळवूनच शांत झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात सेवाकार्याचे केंद्र अशी ओळख असलेल्या मूल शहराला तब्बल पाच दशकानंतर तीच ओळख पुन्हा मिळवून देण्यात श्रमिक एल्गार व त्याच्या प्रमुख पारोमिता गोस्वामी यांचा सिंहाचा वाटा आहे. मूळची कोलकत्याची व मुंबईतून समाजकार्यात पदवी घेतलेली पारोमिता दहा वर्षांपूर्वी या जिल्हयात आली तेव्हा स्थानिक भाषेचा गंधही तिला नव्हता. स्वप्नाळू डोळ्यांची ही मुलगी कुणी सोबतीला नसतांना इथे काय करणार असा प्रश्न तेव्हा सर्वांच्या मनात उभा राहायचा. अवघ्या दहा वर्षांत पारोमिताने या प्रश्नाचे उत्तर सर्वांना देऊन टाकले आहे. तिने स्थापन केलेल्या संघटनेचे पंचेवीस हजार सभासद व पाचशे पूर्णवेळ कार्यकर्ते चंद्रपूर व गडचिरोली या दोन जिल्हयात आहेत. आपल्या मोजक्या पण विश्वासू सहकाऱ्यांच्या साथीने पारोमिताने या जिल्हयातील महिला, आदिवासी, दलित, कामगार, शेतकरी, शेतमजूर या गरीब घटकांसाठी जो लढा दिला त्याचे सर्व स्तरावरून कौतूक झाले. एखादे काम हाती घेतले की त्याची तड लागेपर्यंत स्वस्थ बसायचे नाही हा कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये आवश्यक असलेला गुण पारोमितामध्ये ठासून भरला आहे. वेठबिगाराचे प्रकरण असो, आदिवासींच्या जमीनी परत मिळवून देण्याचा प्रश्न असो वा चित्रा मट्टामीचा लढा असो, पारोमिता व तिची संघटना न्याय मिळवूनच शांत झाली. प्रश्न रेंगाळत ठेवण्याच्या राजकीय कलेला तिने आजूबाजूलाही फटकू दिले नाही. त्यामुळे अन्यायग्रस्त लोक तिच्याकडे मोठ्या आशेने बघतात. उपेक्षितांचे प्रश्न सोडवतांना प्रशासनाशी तिचा होणारा संघर्ष आता तिच्या जीवनशैलीचा एक भाग झाला आहे. या संघर्षांत अनेकदा तिला कारागृहात जावे लागले. थंडी, ऊन, वारा, पाऊस झेलत रस्त्यावर रात्री काढाव्या लागल्या. पण यातून खचून जाण्याऐवजी तिच्या उमेदीत व जिद्दीत सतत वाढ होत गेली.

लोकशाहीच्या मार्गाने लढे देऊनही प्रश्न सुटत नाही म्हटल्यावर न्यायालयाच्या माध्यमातून यश कसे मिळवायचे असते, हे पारोमिता व तिच्या संघटनेने या भागाला दाखवून दिले. लोकशाहीवर नितांत श्रद्धा असलेल्या व कायम लोकांसाठी संघर्ष करणाऱ्या पारोमिताच्या वाट्याला दु:खाचे क्षणही काही काळ आले. तिची बंगाली पार्श्वभूमी लक्षात घेऊन काही स्थानिक राजकारण्यांनी प्रशासनाला हाताशी धरून तिला नक्षलवादी ठरवून टाकले आणि संघटना बंदीची कारवाई सुरू केली. तेव्हा सैरभर झालेली पारोमिता थेट न्यायालयात गेली व दीड वर्षांची लढाई जिंकूनच परत आली. त्या काळात तिची संघटना मोडते की काय अशीच शंका सर्वांना येत होती पण लढाई जिंकताच ही संघटना तेवढ्याच ताकदीने उभी राहिली. केवळ संघटनेसाठी आणि त्यामाध्यमातून वंचिताचे प्रश्न सोडवता यावेत म्हणून हैद्राबादच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेने देऊ केलेल्या प्राध्यापकाच्या नोकरीवर पाणी सोडणाऱ्या पारोमिताने आता दारूबंदीचा लढा हाती घेतला आहे. या प्रश्नावर निघालेल्या महिलांच्या पदयात्रेने थंडपणे चाललेल्या हिवाळी अधिवेशनाचा नूर पार पालटून गेला. पुरुषाच्या व्यसनाचे चटके सहन करणाऱ्या या कष्टकरी महिला पायांना चटके देत जेव्हा अधिवेशनावर चालून गेल्या तेव्हा सरकारही क्षणभर हबकलेच. या यात्रेत इतक्या मोठ्या संख्येत महिला कशा या प्रश्नाचे उत्तर पुन्हा पारोमिता व तिच्या संघटनेच्या कार्यशैलीत दडले आहे. कोणताही प्रश्न हाती घेतला की त्याच्या मूळापर्यंत जायचे हा पारोमिताचा स्वभाव आहे. या यात्रेच्या आधीचे सहा महिने पारोमिता पायाला भिंगरी लागल्यागत गावोगाव फिरली. प्रत्येक गावात ठराव, त्याला कुठे विरोध तर कुठे सहमती असे प्रकार होत एक वातावरण निर्मिती झाली. त्यामुळेच या यात्रेचे स्वरूप मोठे झाले.

केवळ लढे देणे हे एकमेव काम पारोमिता व तिच्या संघटनेचे नाही. श्रमिक एल्गारने मूलमध्ये मोठे संकूल उभारून अनेक रचनात्मक कामे सुरू केली आहेत. एक कोटीची उलाढाल असलेली महिलांची पतसंस्था, लाखोंची उलाढाल करून शेतकऱ्यांना माफक दरात खत व बियाणे मिळवून देणाऱ्या सहकारी संस्था, ग्रामीण मुलांसाठी बालविज्ञान व पर्यावरण केंद्राची स्थापना, असे अनेक उपक्रम ही संघटना राबवत आहे. कायदे सोप्या भाषेत सांगणारी पाच पुस्तके लिहणाऱ्या पारोमिताला अमेरिकेतील येल विद्यापीठाने अभ्यासवृत्ती देऊन गौरवले आहे. पती कल्याणकुमार व आरंभापासूनचा सहकारी विजय सिद्धावार आणि शेकडो कार्यकर्त्यांच्या मदतीने सेवाकार्याचा व्याप विस्तारणाऱ्या पारोमितासमोर आता खरे आव्हान जिल्हा दारूबंदीचे आहे.

- संपादक
लोकसत्ता, नागपूर

# गाव तेथे बस साठी आंदोलन




मागील दोन वर्षापासून श्रमिक एल्गारने चंद्रपूर जिल्हयातील बस सेवेचा प्रश्न हाती घेतला. गाव तेथे बस असे शासनाचे धोरण असले तरी, चंद्रपूर जिल्हयातील तब्बल 350 चे वर गावात अजूनही बसेस जात नसल्यांची बाब श्रमिक एल्गारने उघडकीस आणली. या गावाचे यादीसह चंद्रपूरात जिल्हाधिकारी कार्यालयावर बसेससाठी मोर्चा काढण्यात आला.

बस जात नसलेले सर्व गावे ही दुर्गम, आदिवासी बहूल आणि जंगलालगतचे गावे आहेत. बस सुविधा नसल्यांने, मुलांचे आणि मुलींच्या शिक्षणात अडचणी तयार होतात, अनेक पालकांना आपली मुले वस्तीगृहात किंवा नातेवाईकांकडे ठेवावी लागते. आरोग्यसेवेचाही प्रश्न निर्माण होतो. याचा फटका विशेषत: महिलांना बसतो. चंद्रपूर जिल्हयात चांगली बस स्थानके तोडून नवे बस स्थानके तयार केली जात आहे, मागणी नसतांना महागडी आणि तोटयातली शिवशाही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर श्रमिक एल्गारने गाव तेथे बस गेली पाहीजे यासाठी आंदोलन सुरू केले. श्रमिक एल्गारचे आंदोलनानंतर, मूल तालुक्यातील नवेगांव, मुरमाडी, गोलाभुज, करवन, काटवन, रत्नापूर येथे बस सेवा सुरू करण्यात आली. फुलझरी येथील पुलाचे काम झाल्यांने तेथील बससेवा लवकरच सुरू होईल.

सावली तालुक्यातील चारगांव, भारपायली, मानकापूर, चक मानकापूर, मेटेगांव येथे बस सेवा सुरू करण्यात आली.

सिंदेवाही तालुक्यातील 23 गावात बसेस जात नाही. यासाठी सिंदेवाही बस स्टेशन येथे आंदोलन करण्यात आले, चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. आता या 23 ही गावात बस सुरू झाली.

मूल येथे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेशा वेळेत बस नसल्यांने, पारोमिता गोस्वामी यांनी मूलच्या बस स्थानकावर विद्यार्थ्यांना घेवून रस्ता रोको आंदोलन केले, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सोयीच्या वेळेत बसेस सुरू झाल्यात.

श्रमिक एल्गारच्या बस आंदोलनाला यश मिळत असल्यांने, गावकऱ्यात आनंद निर्माण झाला, मात्र राजकीय असुयेतून काही राजकीय नेत्यांनी परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकून ही सेवा वारंवार खंडीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र बससेवा सुरूळीत राहीली पाहीजे यासाठी पारोमिता गोस्वामी व्यक्तीश: प्रयत्नशील आहे.

## संघटना बंद पाडण्याचा डाव

श्रमिक एल्गार बंद करण्याच्या हेतूने जिल्ह्यातील बडे प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी चंग बांधला होता. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी जे. पी. गुप्ता यांनी श्रमिक एल्गारच्या देणगीदारांना पत्र पाठवून देणग्या देण्यास मनाई केली. बँकेतूनही पैसे निघणार नाही यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्या या कृतीला जाब विचारण्याचा निर्णय पारोमिता गोस्वामी यांनी घेतला. यासाठी हायकोर्टात जाण्याची तयारी केली. ॲड. आशुतोष धर्माधिकारी हे केस लढण्यासाठी पैसे तर घेणार नव्हतेच, मात्र चंद्रपूर नागपूर प्रवास, कोर्टात लागणारी कोर्ट फी, डॉक्युमेंट तयार करणे यासाठी लागणारे पैसे त्यावेळी नव्हते. काय करायचे यावर चर्चा चालु असतानाच पारोमितानी आपल्या हातातील सोन्याचा कडा काढून अभिजित चेपूरवारच्या हातात दिले, आणि सांगितले चिमड्यालवारच्या दुकानात हा कडा विकून टाक. कडा विकून जेवढे पैसे तेवढे घेऊन ये, आपण या कलेक्टरला सोडायच नाही. अभिजीत ने तो कडा घेतला, आणि त्यातून आलेल्या पैशातून हायकोर्टाची केस करण्यात आली.





श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

घनश्याम मेश्राम

# वनहक्काचा लढा

जबरानजोत हा शब्द चंद्रपूर- गडचिरोली भागात प्रसिध्द आहे. महसूल आणि वनजमिनीवर अतिक्रमण करून, त्यावर मागील कित्येक पिढ्यांपासून चंद्रपूर-गडचिरोली जिल्हयात लाखो शेतकरी आपले उदरनिर्वाह करीत आहेत. देशाची अन्नधान्याची उत्पादकताही वाढवित आहे. मात्र, शासनाने वेळोवेळी आश्वासन देऊनही या अतिक्रमणधारकांना त्यांच्या ताब्यातील जमिनीचे पटटे दिले नाही. यासाठी जिल्हयात सर्व पक्षानी, संघटनेनी मागणी केली. मोर्चे-आंदोलने केली. मात्र, यश आले नाही. श्रमिक एल्गारचे सभासद शेतकऱ्यांसाठी जबरान जोतदाराचे आंदोलन पुढे नेण्यांसाठी "वनहक्क शेतकरी अभियान" सुरू केले.

चंद्रपूर जिल्हयात हजारो शेतकऱ्यांना महसूल विभागाने, 'कच्चे पटटे' दिले, असे शेतकरी श्रमिक एल्गारकडे आले. पारोमिता गोस्वामी यांनी जमिन कायदयांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, 'कच्चे पटटे' हा प्रकारच कायदयात नाही. म्हणून त्यावेळचे जिल्हाधिकारी के. बी. भोगे यांना महसूल विभागाची ही चुक लक्षात आणून दिली. त्यांनीही चुक मान्य करीत या शेतकऱ्यांना पटटे देण्याचे त्यावेळचे तहसिलदार लांजेवार यांना निर्देश दिले. 28 शेतकऱ्यांना कच्चे पटटे देण्यात आले. श्रमिक एल्गारच्या माध्यमातून जबरान जोतदारांना पटटे मिळत असल्यांने, तहसिलदारांवर राजकीय दबाव टाकण्यात आला आणि उर्वरित प्रकरण 'लालफितशाही'त अडकलेत.

याच दरम्यान 2002 मध्ये वनविभागाने शेतकऱ्यांचे अतिक्रमण हटविण्यांचे आदेश काढलेत. या आदेशाचे विरोधात चंद्रपूर- गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या बाजूने ''टि. एन. गोदावर्मन विरूध्द भारत सरकार' या सुप्रिम कोर्टातील केसमध्ये श्रमिक एल्गारच्या अध्यक्ष ॲड पारोमिता गोस्वामी यांनी 'इंटरवेंशन पिटीशन' दाखल करून, वनविभागाच्या कारवाईवर स्थगिती मिळवून घेतली. यामुळे संपुर्ण भारतातील अतिक्रमणदारांना लाभ मिळाला. चंद्रपूर- गडचिरोली जिल्हयातील शेतकरी केवळ वनावर अतिक्रमण करून, जंगले नष्ट करीत नाहीत तर, संयुक्त वनव्यवस्थापन करून, हजारो एकर वनाचे संवर्धन व संरक्षण करीत आहेत. याकडे शासनाचे आणि सुप्रिम कोर्टाचे लक्ष वेधून घेतले. सर्वोच्च न्यायालयाचे स्थगितीनंतर, श्रमिक एल्गार आणि राज्यातील काही मित्र संघटनेच्या माध्यमातून शासनाने वनजमिनीवरील अतिक्रमणदारांना पटटे देण्यांची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

सन 2002 मध्ये शाससनाने संघटनेची मागणी मान्य करीत, राज्यातील अतिक्रमणाची ''पात्रता- अपात्रता' तपासण्यासाठी समिती जाहीर केली व तसे शासननिर्णय निर्गमीत केले.

शासनाने गावस्तरावर पात्रता समिती नेमण्याचे आदेश काढले तरी, चंद्रपूर- गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाने अशी समिती नेमण्याबाबत सहा महिणे होऊनही कारवाई केली नाही. श्रमिक एल्गारने या प्रश्नावर सकारात्मक आंदोलन जाहीर करून, भूमीहक्क अभियान सुरू केले. शासन निर्णयातील तरतुदीनुसार अशासकीय समितीचे सदस्यांचे समितीसमोर अतिक्रमणाचे दावे सादर करून, पात्रता, 1200 शेतकऱ्यांचे अपात्र अतिक्रमणाचे, अर्ज, यादया जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले. हे दावे स्विकारण्यास सुरूवातीला जिल्हाधिकारी यांनी नकार दिला. मात्र, संघटनेने आक्रमक भुमिका घेतल्यानंतर, तत्काळ गावस्तरावरील पात्रता समिती नेमण्यांचे आदेश काढून सर्व अर्ज संबधित तहसिल कार्यायात जमा करण्यांचे आदेश दिलेत.

श्रमिक एल्गारने दाखल केलेले. अर्जातील 90 टक्केच्या वर अतिक्रमणदारांचे दावे पात्र करण्यात आले, काहीचे दावे अपिल दाखल करून पात्र झाले. भूमि अभियान राबवितांना, सभासद फि आणि फार्मचा खर्च असे 15 रूपये घेण्यावरून, तेव्हा भाजपाच्या मूल व सावली तालुक्यातील कार्यकर्त्यांनी पत्रके काढून अभियानाची बदनामी सुरू केली.

श्रमिक एल्गारच्या या अभियानामुळे गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी, मुलचेरा येथील बंगाली बांधवानाही मोठा दिलासा मिळाला. पात्र अतिक्रमणदारांना पटटे देण्यांची कारवाई सुरू होईल, अशी शक्यता निर्माण झाली असतांनाच, केंद्र सरकारने, नविन वनहक्क कायदा आणून, या कायदयाअंतर्गत वनजमिनीवरील अतिक्रमणदारांना पटटे देण्यांची कारवाई करण्यांचे जाहीर केल्यांने, जबरानजोतदारांच्या अपेक्षेला पुन्हा एकदा सुरूंग लागला.

केंद्र सरकारने अनुसूचित जाती व इतर पारंपरिक वनवासी यांचे वनावरील हक्क या कायदांचा मसुदा प्रकाशित केला. या मसुदयात, गैरआदिवासीसाठी तीन पिढयाची अट व एक पिढी म्हणजे 25 वर्ष असेल असे नमुद करून, ही अट पूर्ण करणाऱ्यास वनहक्क देण्यांची तरतूद केली.

चंद्रपूर- गडचिरोली जिल्हयात आदिवासीसह गैरआदिवासी, ढिवर, दलित, मुसलमान, कुरमार, ओबीसी समाजाचे वनजमिनीवर अतिक्रमण आहे. दोनही जिल्हात वनजमिनीचे प्रमाण अधिक असल्यांने उदरनिर्वाहासाठी वनजमिनीशिवाय पर्याय नाही. कायदयात आदिवासी व गैरआदिवासी असा भेद राहील्यास, यादवी माजेल, अशी भूमिका घेत पारोमिता गोस्वामी यांनी मसुदयातील तीन पिढीची अट रदद करण्याची मागणी केली. जिल्हयातील सर्व आमदार, खासदार यांचेसह केंद्र सरकारचे सर्व संबधित मंत्रालयात यावर आक्षेप नोंदविण्यात आला. मुंबई येथे केंद्र सरकारच्या वनसंसदीय समितीच्या बैठकीत (त्यावेळचे चंद्रपूरचे खासदार नरेश पुगलीया उपस्थित होते) तीन पिढयांची अट या कायदयात असू नये अशी मागणी केली.

देशभरातील सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची नागपूर येथे विनोबा विचार केंद्रात बैठक झाली होती. या बैठकीतही श्रमिक एल्गारने गैरआदिवासीसाठी अशी अट आमच्या दोन जिल्हयात मारक ठरेल, अशी भूमिका घेतली.

गैरआदिवासीसाठी तीन पिढयांची अट कशी जाचक, जबरानजोतदारांवर अन्याय करणारी आणि तर्कसंगत नाही हे स्पष्ट करणारे मराठी आणि इंग्रजीत दोन पुस्तके श्रमिक एल्गारने प्रकाशित केली होती. दुर्देवाने श्रमिक एल्गारच्या या मागणीला कुणीही गांभीर्याने घेतले नाही. त्याचे परिणाम आज लाखो गैरआदिवासींना भोगावे लागत आहे. वनहक्क कायदा 2006 मध्ये अस्तित्वात आल्यानंतर, तब्बल 8-10 वर्षानी या कायदाची अमंलबजावणी होत आदिवासींचे वनहक्कांना मान्यता देणे सुरू केले, गैरआदिवासींचे दावे तर स्विकारल्याही जात नव्हते.

जबरानजोत दारांच्या रेटयामुळे हे अर्ज स्विकारल्या गेले तरी, ते फेटाळण्यांचेच धोरण राहीले. यामुळे श्रमिक एल्गारने पुन्हा, "श्रमिक एल्गार वनहक्क अभियान" सुरू केले. या अभियानाअंतर्गत, 1. गैरआदिवासीसाठी असलेली तीन पिढयांची अट रद करावी 2. आदिवासींचे मंजूर दाव्यांचे स्वतंत्र 7/12 देण्यात यावा, 3. ग्रामसभेची 50 टक्के उपस्थितीची अट रदद करावी आणि 4. वन्यप्राण्यामुळे होणाऱ्या नुकसान भरपायीची दुप्पट भरपायी देण्यात यावी.

या मागणीसाठी श्रमिक एल्गारने ॲड. पारोमिता गोस्वामी यांचे नेतृत्वात चंद्रपूर जिल्हयात आतापर्यंत 10 मोठे मोर्चे काढण्यात आले, मुंबई येथे मंत्रालयावरील मोर्चात श्रमिक एल्गारने सहभाग घेतला. तीन पिढीची अट रद करावी, यासाठी त्यावेळचे केंद्रिय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांचे सह सर्वपक्षीय मोठी सभा बैलमपूर तह. कोरपणा येथे घेण्यात आली.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने त्यांचे जाहीरनाम्यात, तीन पिढीची अट रद करण्याचे जाहीर करावे अशी नागपूर येथील बैठकीत जाहीर मागणी करण्यात आली. दिल्ली येथे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे प्रचार प्रमुख जयराम रमेश यांची भेट घेऊन या तरतुदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची जाणीव करून देत, ही अट रदद करण्यासाठी पुढाकार घेण्यांचे आवाहन करण्यात आले. जानेवारी 2019 मध्ये बारामती येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, जेष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेबांची भेट घेवून, विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय दयावा अशी मागणी करण्यात आली.

लोकसभा निवडणूकीचे पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री नागपूरात आले असतांना, वनहक्क मिळण्यांस गैरआदिवासीसाठी असलेली तीन पिढयांची अट काढण्यासाठी राज्यशासनाने केंद्रसरकारकडे पाठपुरावा करावा, चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळाला घेवून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची भेट घालवून द्यावी अशी मागणी केली. वनहक्क कायदयातील तीन पिढीची अट जाचक असल्यांने, त्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे, ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य करीत, ही अट काढण्याबाबत राज्यसरकार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करेल असे जाहीर सभेत आणि लेखी आश्वासनही दिले. मात्र या आश्वासनाची पूर्तता अजूनही झाली नाही. तीन पिढीची अट काढण्यांत यावी यासाठी दिलेले आश्वासन पुर्ण करावे यासाठी श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा ॲड. पारोमिता गोस्वामी आतापर्यंत 3 वेळा मुख्यमंत्री, मुख्यसचिव यांची भेट घेवून पाठपुरावा करीत आहे. सरकार हलत नाही आणि श्रमिक एल्गारचा लढा थांबतही नाही.

"जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये काम करीत असताना पारोमिताच्या लक्षात आले की, झरपट नदीवर सेक्स वर्करचे काम करणाऱ्या महिलांकडे रेशन कार्ड नाही. रेशन कार्ड मिळवून देण्याचा निर्णय घेतला. तिने सर्व महिलांना सांगितले की, उद्या एसडीओ आफीस मध्ये या. वीस तीस महिला पारोमिताच्या सांगण्यानुसार बारा वाजता एसडीओ कार्यालयात उपस्थित झाल्यात. एस. डी. ओ. कार्यालयातील संबंधित बाबूने सांगितले की, 'या चंद्रपूरच्या आहेत हे तुम्ही सिद्ध करा. यांच्याकडे कोणता पुरावा आहे?' पारोमिता समोर अडचण निर्माण झाली तेवढ्यात एक बाई पुढे येऊन म्हणाली, 'साहेब' ओळखले का मला! माझ्या घरी तुम्ही रात्री आले होते आता हळू बोलतोय, काम करणार नसेल तर जोराने बोलीन' तिचे वाक्य ऐकताच तो बाबू खजील झाला. सर्वांना रेशन कार्ड चे फॉर्म दिले आणि पहिल्यांदा झरपट नदी वरील सेक्सवर्कचे काम करणाऱ्या बायांना रेशन कार्ड मिळाले.

## रेशनसाठी आंदोलन

केंद्रातील एनडीए सरकारने रेशन व्यवस्था नष्ट करण्याच्या हेतूने रेशनचे भाव तिप्पट वाढविले. याचा निषेध करण्यासाठी श्रमिक एल्गारने सिंदेवाहीत रस्ता रोको आंदोलन केले. शेकडोच्या संख्येत जेलात गेलेल्यांना चंद्रपूर कारागृहात जागा नसल्याने, नागपुरात हलविण्यात आले.

नागपुरातही जागा नसल्याने अर्धे सत्याग्रहींना अमरावती कारागृहात नेण्याची चर्चा सुरू झाली. त्याच वेळी जेलमधून आरोपींना काढणे सुरु होते. याच क्षणाचा फायदा घेत पारोमिताने त्या लहानशा दरवाज्याच्या मध्ये आपला पाय ठेवला व्हिडिओ जेलरला दरवाजा बंद करता आला नाही पारोमिता चा पाय दाबला गेला. जेलर ओरडला, 'ये लडकी क्या कर रही तुझे समजा क्या कैदी भाग जायेंगे.'

'कैदी भाग जायेंगे तो आप मुझे क्या करोंगे?' पारोमिता ने जेलरला उत्तर दिले

'जेल में डाल देंगे' जेलर चे उत्तर

मुबसे से हम यहा पर आये है जेल मे जाने के लिए, हम यही तो बोल रहे जेल में जल्दी डालो.. पारोमिता ही तेवढ्याच कडक आवाजात बोलली.

त्यानंतर जेलरनी सर्वांना आतमध्ये घेतले, सर्व आत गेल्यानंतरच पारोमिता ने पाय काढला पायाला जखम झाली होती.

## राज्यपालांची गाडी अडवली



मुंबई येथील कमाटीपुरातील महिलांना मुंबईतील पोलिसांनी बेकायदेशीर अटक केली. या महिलांना नेमके कुठे ठेवले आहे? याची कुठलीही माहिती पोलीस देत नव्हते. त्यावेळी मुंबईत राहणाऱ्या पारोमिताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या समोर राज्यपालाच्या गाडीच्या बॉनेटवर पाय ठेवून राज्यपालाची गाडी अडवली आणि या महिलांचा प्रश्न सुटला. मात्र राज्यपालाची गाडी अडविल्याने पारोमिता आणि तिच्या सोबत असणाऱ्या महिलांना पोलिसांनी अटक केली. त्यादिवशी पारोमिताचे वडील तिला भेटायला कलकत्यावरुन आले होते आणि. भेटून सायंकाळच्या विमानाने ते परत जाणार होते. पोलिसांनी परिस्थिती लक्षात घेऊन पारोमिताला सोडण्याची भूमिका घेतली व पारोमिता तसा निरोप आपल्या वडिलांना दिला मात्र वडिलांनी सांगितले की, लढायला गेलेल्या सैनिकांनी सर्वा सोबतच राहायचे असते. जोपर्यंत सर्व घरे घरी जाणार नाही तोपर्यंत तुम्ही घरी जाऊ नकोस, मी तुला नंतर भेटायला येईल. त्यावेळी पारोमिता केवळ पंचेवीस वर्षांच्या होत्या.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

**महेंद्र कुलकर्णी**

श्रमिक एल्गार ने सुरुवातीच्या काळात ग्रामीण भागातील तरुणांना घेऊन काहीक गावात बालसंस्कार केंद्र सुरू केले. सिंदेवाही तालुक्यातील पेटगाव येथील रूपमाला गजबे ही तरुणी या केंद्रात स्वयंसेवक म्हणून आली. काही वर्षांनंतर तीचा डी.एड. साठी जळगावला नंबर लागला. मात्र जाण्यासाठी पैसे नाही आणि साहित्यही नाही म्हणून मी डीएड ला ॲडमिशन घेणार नाही असे तिने आईला सांगितले. त्यामुळे ती ताईकडे आली ताईने पारोमिताने जळगाव येथे जाण्यासाठी, राहण्यासाठी काही पैसे दिले आणि तिच्याकडे अंथरुणाची व्यवस्था नसल्याने ताईने तिला सांगितले की, माझ्याकडे एकच गादी आहे ती गादी आणि चादर तू घेऊन जा. तसंही मी उद्या गावाला जाणार आहे आणि मग तिथून आल्यानंतर मी दुसरे घेऊन घेईल. रूपमाला गजबे आज जिल्हा परिषदेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहे.

# साध्याच माणसांचा एल्गार येत आहे



"साध्याच माणसांचा एल्गार येत आहे,
हा थोर गांडुळांचा भोंदू जमाव नाही."

सुरेश भटांची ह्या दोन ओळी ! यातला शब्द 'एल्गार' आणि त्याचा अर्थ म्हणजे-पुढे सरकत असणारं सैन्य! नाही हा लेख सुरेश भटांच्या कवितेचे रसग्रहण करणारा नाही- तर हा लेख आहे 'श्रमिक एल्गार" वरचा- म्हणजे श्रमिकांची सेना! आता श्रमिकांची नुसती सेना असेल, पण त्यांच्याकडे योग्य सेनापती नसेल तर ती सेना काय करू शकेल? पण या 'श्रमिक एल्गार' च्या बाबतीत तसे झालेले नाही. त्यांना अगदी योग्य सेनापती लाभलाय ज्या मुळे प्रत्येक बाबतीत या सेने ने हातात घेतलेले काम पुर्ण केलंय.

प्रत्येक वेळेस जेंव्हा एखादा ब्लॉग लिहतो, आणि त्यामधे काही करायची वेळ येते, किंवा एखाद्या गोष्टीबद्दल ब्लॉग वर एखाद्या इश्यु बद्दल लिहले की बऱ्याचशा कॉमेंट्स अशाही असतात, की असे लेख लिहून काय होणार? काय करू शकतो आपण? सगळ्या सिस्टीम च्या विरुद्ध आपण उभे राहूच शकत नाह, सगळी कडे करप्शन आहे भरलेले. ही लाल फित शाही काही काम करूच देणार नाही कोणाला, हे जे काही आहे, ते असेच चालत रहाणार वगैरे वगैरे...

डोंबीवली फास्ट मधल्या नायकासारखी मानसिक घडण होत असते आपली बरेचदा! त्या डोंबीवली फास्ट च्या नायकाने स्वीकारलेला मार्ग पण योग्य वाटतो. वाटतं की हत्यार हातात घेऊन रस्त्यात येणाऱ्या सगळ्या अडचणींचा बिमोड करावा! हा मार्ग जरी अयोग्य असला तरी सुद्धा बरेचदा आपलं मन त्या मार्गाकडे झुकते हे नक्की. अर्थात आपल्यावरचे संस्कार मात्र त्या गोष्टी तुम्हा-आम्हाला करू देत नाहीत हे नक्की..

रुक्मिणी अवॉर्ड स्विकारतांना.. परोमिता गोस्वामी

पण केवळ योग्य दिशेने प्रयत्न करून गुंता सोडवण्याचे कसब असेल, तर कुठलेही काम कायद्याच्या चौकटीत राहुन पुर्ण केले जाऊ शकते ह्यावर आपला लवकर विश्वासच बसत नाही. परवाच वर्षाचा एक् मेल आला होता, आणि परोमिता गोस्वामी बद्दल समजले, की जिने चंद्रपूर जिल्ह्यात एकांगी लढा लढलाय गेले एक तप! त्यांच्या बद्दल वाचल्यावर मात्र जर एक गोष्ट लक्षात आली, की जर एखाद्याची खरंच काही करायची इच्छा असेल तर कुठलीच गो्ष्ट ध्येयपूर्तीकडे जाण्याच्या आड येऊ शकत नाही . त्याचीच ही कथा -मनातल्या पॉझिटीव्ह विचारांना नक्कीच चालना मिळेल हे वाचल्यावर .

माणिकगढच्या शेतकरी स्त्रिया ज्यांच्यासाठी माणिकगढ सिमेंट विरुद्ध रणशिंग फुंकले होते त्यांच्या बरोबर श्रमिक एल्गार! सुरुवातील अगदी साधारण स्वरूपातील सुरु झालेल्या या संघटनेचे सध्या २० हजाराच्या वर सदस्य आहेत. श्रमिक एल्गार ट्रेड युनियन ॲक्ट च्या अंतर्गत रजिस्टर केलेली चंद्रपुर येथील एक संस्था – कुठलेही राजकीय लागेबांधे नसलेली. इथल्या भागात रहाणाऱ्या आदिवासी आणि गैर आदिवासी लोकांसाठी ही संस्था काम करते. जंगल विषयक कायदा, दारूबंदी , शिक्षण वगैरे सगळ्याच सामाजिक गोष्टी आहेत की ज्यांच्याबद्दल आंदोलनं केली आहेत एल्गारने.

गडचिरोली जिल्हा! हे नांव प्रत्येकाने ऐकले असेलच. पोलीस डीपार्टमेट मधे शिक्षा म्हणून या जिल्ह्यात पोस्टिंग देतात म्हणून तरी हे नाव सगळ्यांना माहीती आहे, नाहीतर संयुक्त महाराष्ट्रात हा जिल्हा आहे हे कोणाच्याच ध्यानी मनी ही आलं नसतं. (महाराष्ट्रात असूनही नसलेला हा जिल्हा आहे.) नक्षलवादी कारवाया अगदी जोरात सुरु असतात इथे. या जिल्ह्यातल्या जंगलाला नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला म्हंटलं तरीही चालेल, इतका जोर आहे त्यांचा इथे!

चंद्रपूर पासून जवळ असूनही दूर असलेला हा जिल्हा. नक्षलवादाचा या भागात असलेला प्रभाव, आणि त्यामुळेच या भागात लोकांसाठी, (आदिवासी किंवा इतर) काही काम करणे अतिशय कठीण. नक्षलवाद्यांना हे सामाजिक काम करणारे लोकं म्हणजे सरकारी वाटतात, तर सरकारी लोकांच्या मनात कायम संशय असतो की हे लोकं नक्षलवाद्यांशी तर निगडित नाहीत? इथे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना नक्षलवाद्यांशी आपले नांव जोडले जाईल का-ही भिती कायम मनात असते. पण अशा प्रतिकूल परिस्थिती मधे गेले एक तप काम करणारी एक व्यक्ती म्हणजे परोमिता गोस्वामी आणि त्यांचे सहकारी!

श्रमिक एल्गार ने या भागात काम सुरु करूनही आता जवळपास दहा एक वर्ष झाली असावीत. फॉरेस्ट राईट्स ॲक्ट या कायद्या अंतर्गत त्या भागातल्या आदिवासी लोकांना जमिनीचे पट्टे देण्याचे प्रावधान आहे ,पण शासनाच्या कूर्मगतीने सुरु असलेल्या कामामुळे , चंद्रपूर जिल्ह्यातल्या आदिवासींना मात्र या तरतुदी पासून काहीच फायदा होत नव्हता, तेंव्हा परोमिता गोस्वामी यांच्या सपोर्ट वर काही आदिवासी/ गैर आदिवासी शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन, जंगलाच्या काही भागात केलेली शेती, त्यांना झालेली अटक... वगैरे घटना इतक्या वेगाने घडल्या की, श्रमिक एल्गारचे नांव सर्वतोमुखी झाले.

१९९९ मधे सरकारी लालफितशाहीने सरळ या संघटनेचा नक्षलवाद्यांशी संबंध आहे म्हणून आरोप केले आणि तपासणीचे शुक्लकाष्ठ मागे लावून दिले. नक्षलवाद्यांशी काही संबंध नाही हे सिद्ध करण्यासाठी परोमिताला हायकोर्टात केस करावी लागली. हायकोर्टात बरीच वर्ष केस चालली, शेवटी २००२ मधे सेंट्रल गव्हर्नमेंट ने परोमिता आणि त्यांच्या संघटनेला क्लिन चिट दिली- की यांचे कुठल्याही नक्षलवादी ग्रूपशी संबंध नाही.

यांच्या संघटनेने बरीच समाजोपयोगी कामं केलेली आहेत. मुख्य म्हणजे दारू बंदी साठी 'मुल ते नागपूर विधानसभेपर्यंत काढलेला २००० च्या वर कष्टकरी बायकांचा पायी मोर्चा. जवळपास १३० किमी अंतर पायी चालत ३ दिवसात पुर्ण केले होते. दारू मुळे होणारे कुटुंबाचे नुकसान, आणि त्याच्या विरोधात सगळ्या स्त्रियांना एकत्र करून चळवळ उभी करण्याचे मोठे काम त्यांनी केलेले आहे. गवातली दारुची दुकानं बंद व्हावी म्हणून केलेल काम नक्कीच उल्लेखनीय आहे, पण केवळ एवढेच नाही तर, गावांमधला पिण्याच्या पाण्याचा इश्यु, शाळा अशा अनेक गोष्टींसाठी त्यांनी आंदोलनं केली- आणि नुसतीच आंदोलनं केली नाहीत , तर शेवटापर्यंत नेली-अगदी रिझल्ट्स मिळे पर्यंत!

त्यांची एक सगळ्यात मोठी सक्सेस स्टॉरी म्हणजे माणिकगढची. माणिकगढ सिमेंट म्हणजे चंद्रपूर मधला एक बिर्ला गृपचा मोठा सिमेंट कारखाना. सिमेंट कारखान्यामध्ये कच्चा माल म्हणून लाईम स्टॉन वापरला जातो. या लाइम स्टोनची खाण कुठेतरी जवळच असेल तर जास्त चांगलं. लाईम स्टोन ला खाणी मधून प्रोसेसिंग प्लांट पर्यंत नेण्यासाठी डम्पर , शॉवेल्स, किंवा कन्व्हेअर चा उपयोग केला जातो. माणीकगढ सिमेंट्ने खाणी पासून कन्व्हेअर बेल्ट लावण्यासाठी सरकारी जमीन वापरायचे ठरवले कारण कन्व्हेअर चा मेंटेनन्स चा खर्च डम्पर्स, शॉवेल्स किंवा डोझर्स पेक्षा फारच कमी असतो , आणि विश्वसनीयता चांगली असते.

माइन्स पासून तर फॅक्टरी पर्यंत असलेली जमीन फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या मालकीची, पण या जमिनीवर तिथले आदिवासी आणि इतर गैर आदिवासी लोक वर्षानुवर्ष शेती करत होते. फॉरेस्टची ही जमीन एकाही शेतकऱ्याच्या नावावर नव्हती हे पण लक्षात घ्या. एक दिवस फॉरेस्ट आणि माणिकगढ सिमेंटचे लोकं या लोकांकडे जमिनीचा ताबा मागायला गेले. भरपूर धमक्या देणे, दंडेली करणे वगैरे सगळे प्रकार करून झाले त्या फॅक्टरीचे. बरेच वेळा तर फॅक्टरीचे लोकं मशिनरी घेऊन पण आले होते काम सुरु करायला पण श्रमिक एल्गार ने या लोकांना भरपूर पाठबळ दिले.

कंपनीचे म्हणणे होते की ती जागा या लोकांच्या नावे नसल्याने तिचे कॉम्पेन्सेशन देण्याचा प्रश्नच येत नाही. कंपनीने मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरोमेंट ॲंड फॉरेस्ट कडून आवश्यक तो क्लिअरन्स पण आणला होता. तसेच जमिनीची नाममात्र लिझ ची किंमत सरकारकडे जमा केली होती .

इकडे सगळ्या शेतकऱ्यांनी जो पर्यंत बाजार भावाने कॉम्पेन्सेशन दिले जात नाही , तो पर्यंत जमिनी ताब्यात घेऊ देणार नाही असा पवित्रा सगळ्या शेतकऱ्यांनी घेतला. कशाचा जोरावर सगळे लोकं कॉम्पेन्सेशन मागत होते? जमीन तर नावावर नव्हतीच एकाही शेतकऱ्याच्या?? हा प्रश्न आला असेलच मनात तुमच्या पण. इथेच परोमिता गोस्वामी यांचे एक्स्पर्ट गायडन्स उपयोगी पडले त्या शेतकऱ्यांच्या, की ज्या मुळे कंपनीला झुकावे लागले, आणि त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

पारोमिता ने काय केलं असेल? 'फॉरेस्ट एंटायटलमेंट ॲक्ट' म्हणून एक कायदा अस्तित्वात आहे, की ज्या कडे कोणाचेच लक्ष नव्हते, या कायद्याच्या अंतर्गत या सगळ्या शेतकऱ्यांची बाजू मांडली आणि शेवटी बाजार भावा प्रमाणे या शेतकऱ्यांना ४ लाख रुपये प्रति एकर नुकसान भरपाई आणि घरातल्या एका व्यक्तीला कंपनी मध्ये नोकरी असे निगोशिएट करून न्याय मिळवून दिला. उभ्या असलेल्या पिकाची जो पर्यंत कापणी होत नाही तो पर्यंत काम सुरु केले जाणार नाही असेही कंपनीने मान्य केले. अर्थात एखादी व्यक्ती जर कायदा जाणणारी असेल , तर तिला कायद्याच्या तरतुदींचा व्यवस्थित वापर करून घेता येतो.

## माणिकगढ जिंकल्यावर...

काही लोकं कसे कुठलेही पोलीटीकल बॅकिंग नसतांना सामाजिक कार्य करू शकतात, आणि त्या मधे यशस्वी पण होऊ शकतात ह्याचं उदाहरण आहेत म्हणजे परोमिता गोस्वामी. जेंव्हा एखादा सुशिक्षित माणुस मनावर एखादी गोष्ट घेतो, तेंव्हा तो कायद्याच्या चौकटी मधे राहुन सुद्धा एखादे काम कसे करवून घेऊ शकतो याचे हे उदाहरण- 'डोंबीवली फास्ट' हे प्रत्येक गोष्टीचे उत्तर नाही!

पब्लिक पंचनामा
लोकलढ्याचा साथीदार





श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

विजय सिध्दावार

चंद्रपूर जिल्हयातील राजूरा उपविभागातील जमिनीचा मोठा लढा श्रमिक एल्गारने उभारला. या लढयात पारोमिता गोस्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपले जीव धोक्यात घालून, तेथील गरीब कोलाम, गोंड आदिवासीयांना न्याय मिळवून दिला. पल्लेझरीवरून भिमराव आत्राम या कोलामांनी फोनवरून माहिती दिली कि, त्या गावचे गैरआदिवासी सावकार त्यांची जमिन हिसकाविण्यांचा प्रयत्न करीत आहे, पटवारी आणि तहसिलदार हे त्यांना साथ देत आहे. विजय सिध्दावार, विजय कोरेवार आणि पारिश मेश्राम असे तीघेजण पल्लेझरीत प्रकरण पाहण्यासाठी गेलो असता अनेक धक्कादायक घटना कानावर आल्यात. कुणी दारूसाठी, कुणी लग्नासाठी, कुणी दिडी दुप्पटीची सावकारी करून आणि कुणी तंबाकू-बीडी पाजून या कोलामांच्या जमिनी ठेक्यांने घेतल्या. आणि परत न करताच आपल्या नावांवर करून घेतल्या. मुळ रेकार्ड आदिवासींच्या नावांने आणि चालू सात बारा गैरआदिवासींच्या नांवाने. बैठकीत सांगीतल्या गेले कि, अख्या पहाडावर हजारो कोलाम, गोंड आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींच्या ताब्यात आहेत. यातील अनेक आदिवासी जीवांच्या भितीने आंध्रप्रदेशात पळून गेले आहे. परिस्थितीची गंभीरता, कार्यकर्त्यांनी पारोमिता गोस्वामी यांचेकडे कथन केली, श्रमिक एल्गारने केंद्रिय कमेटीत निर्णय घेतला, 'माणिकगड पहाडावरील इंच न इंच जमिन आदिवासींना परत मिळवून द्यायचे' आलेल्या प्रकरणावर जीवती तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चात 30-40 लोक उपस्थित होते. नंतर माहिती पडली कि, गैरआदिवासींनी पहाडावर दहशत तयार करून, आदिवासींना मोर्चात येवू दिले नाही.

(या लढयांची संपूर्ण माहीतीचे पुस्तक 'डॉन एट मानिकगड' असून ते पारोमिता गोस्वामी यांनी लिहीले आहे. इच्छुकांनी पुस्तकासाठी श्रमिक एल्गारशी संपर्क करावा)

# आदिवासीच्या जमिनी परत मिळवून दिल्या

श्रमिक एल्गारने निर्णय घेतला, आंबेझरी येथे जमिन शिबीराचे आयोजन केले. पत्रके वाटण्यात आली. कागदपत्रासह आदिवासींना तेथे बोलविण्यात आले. पहाडावर गैरआदिवासींनी तणाव तयार केला. पोलिसांनी पारोमिता गोस्वामी व कार्यकर्त्यांना पहाडावर शिबीरास जाण्यास मज्जाव केला. आदिवासींची जमिन त्यांना परत मिळवून देणे हा सरकारचा काम आहे, ते आम्ही करू, तेथे तुमच्या जीवाला धोका आहे, आम्ही जावू देणार नाही, अशी भूमिका पोलिस व महसूल प्रशासनाने घेतली. गैरआदिवासीकडून त्यावेळी शिवसेना उभी झाली होती. आदिवासींवर अन्याय झाला व होत आहे हे माहीत असल्यांने मात्र मताच्या राजकारणात गैरआदिवासींची संख्या जास्त असल्यांने किंबहुना या पक्षाच्या काही नेत्यांनीच आदिवासींची जमिनी बळकाविली असल्यांनी इतर पक्षानी बघ्याची भूमिका घेतली.

श्रमिक एल्गारने मात्र ठाम भूमिका घेतली. तेव्हाचे चंद्रपूरचे पोलिस अधिक्षक मधुकर पांडे यांना, पारोमिताने सांगीतले, ''मी उद्या कार्यकर्त्यासह आंबेझरीला जात आहे, तेथील आदिवासींना जमिनी परत मिळतील किंवा माझा मुडदा परत येईल' पोलिसांचा नाईलाज झाला. नागपूर परिक्षत्राचे पोलिस उपायुक्त यांचे सुचनेनुसार पारोमिता गोस्वामी यांना सुरक्षा व्यवस्था देण्यात आली. संपूर्ण माणिकगड पहाडावर ठिक-ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आले.

दोन गाडया किरायाने करून, पारोमिता गोस्वामी व सर्व कार्यकर्ते आंबेझरीत मुक्कामाने कोलामांच्या गुडयात दाखल झाले. गडचांदूर पोलिस स्टेशनमधूनही आवश्यक बंदोबस्त देण्यात आला.

शिबीराच्या पहिल्याच दिवशी धर्मेराम येथील पोचू लिंगू सिडाम हा हातात मरगळलेली कापडी पिशवी घेवून आला होता, पिशवीतून कागदपत्रे काढून पारोमिताच्या हातात ठेवली. पारोमितांने कागदपत्रे वाचण्यास सुरूवात केली, एक-एक शब्द वाचून चेहरा लाल होत होता, सर्व कार्यकर्ते काय आहे? हे पाहण्यास उत्स्कुक परंतू निस्तब्ध होते.

'पोचू काका इथे बावीस लोकांचे कागदपत्रे आहेत, बाकीचे लोक कुठे आहे? पोचूला मराठी येत नव्हती, त्याला आणलेल्या लक्ष्मण सोयामनी सांगीतले, ताई ते वाकडी मंडलला आहेत, दोघांना आणलो, बाकीचे आंध्रप्रदेशात आहे.

'तुमचा धर्मेराम गाव होता न?' ताई, 'हो' 'मग'

नंदप्पाचे लक्ष्मणनी माहीती दिली, हे सर्व लोक धर्मेराम या कोलाम गुडयावर जन्मोजन्मी पासून राहत होते. एक दिवस रात्रौ मराठावाडयाकडून आलेल्या गैरआदिवासींनी यांचे घरावर दगडफेक केली, एक-दोन जीवननिशी मारले गेले, काही जखमी झाले, जीवाच्या भितीने हे सर्व कोलाम इकडे-तिकडे पळून गेले, नंतर गैरआदिवासींनी यांचे गुडयाला आग लावली, सर्व जमिनी हिसकावून घेतल्या. प्रकरण साऱ्यांच्याच लक्षात आले, माणिकगड पहाडावरील जमिनी आदिवासीकडून गैरआदिवासीकडे कशा गेल्या याचे चित्र उभे होत होते.

'पहा लक्ष्मण भाउ, याची केस क्लियर आहे, यांनी एसडीओकडे जमिनीची ताबा मागण्यांचा अर्ज 10 वर्षापूर्वीच केला होता, एसडीओ आणि कलेक्टर यां दोघानीही याचा अर्ज मंजूर करून, तहसिलदार यांना आदेश केले आहे कि, त्यांनी पोचू व इतर सर्वांचे जमिनीचे ताबे दयावे' दुसरा कागद वाचीत, त्या पुढे म्हणाल्या, तहसिलदारांनी हे काम मंडल अधिकाऱ्यांकडे तर मंडल अधिकारीने ताबा देण्याबाबत पटवारीला आदेश दिले आहेत.

हो ताई, पण पटवारी लागू दिला नाही, सात वर्षापासून फेरा मारीत आहेत हे लोक. जिल्हाधिकारीचे आदेश होवून, त्याची अमंलबजावणी सात वर्ष नाही. तेवढयात येल्लापूर येथील राजकुमार चिकटे हा गैरआदिवासी तरूण रामा सिडाम या आदिवासीं कोलामांला घेवून पुढे आला, त्यांनी सांगीतले, 'ताई, हा येल्लापूरचा रामा सिडाम, याची जमिन गावचा पाटील हिसकत आहे, शेतात याची बायको, भिमबाई सिडाम पऱ्हाटी पेरणी करीत असतांना, तीला बेदम मारले'

'ती कोणत्या दवाखाण्यात आहे?' ताई

'नाही ताई, ती घरीच पडून आहे, उठता येत नाही, चालता येत नाही, गाडीपण नाही, पैसेही नाही'

'तीच्या जीवाला धोका आहे तर, मग हे काम नंतर करू, आधी येल्लापूरला जावू' असे म्हणत त्या उठल्या.

सर्व कार्यकर्तेही गाडीत बसले, शिबीरापासून 45-50 कि.मी. अंतरावरील येल्लापूर गाव, पण रस्त्याची वाट लागल्यांने, तब्बल तीन तास लागले, 5 किमी चालत जावे लागले.

येल्लापूरच्या कोलाम गुडयातील झोपडीत भिमबाई गलितगात्र पडली होती. तीला पाहील्यानंतर, ताईचा इशारा मिळताच, तातडीने मुर्लीधर कोडापे (सामदा तह. सावली) यांनी तीला उचलून घेतले, नंतर, खाटेवर टाकून पाच किमी गाडीपर्यंत आणले, कोरपणाच्या ग्रामिण रूग्णालयात भरती केले, दोन लहान खोल्यातील हे ग्रामिण रूग्णालय होते, डॉक्टर जागेवर नव्हते, नर्स नव्हत्या, तेथे काम करणाऱ्या मुलांने, धावत-धावत डॉक्टरच्या खाजगी रूग्णालयात जावून ही माहिती दिली. डॉक्टर आले, ग्रामिण रूग्णालयाची मोठी इमारत बनली आहे, उदघाटनासाठी मंत्रीची तारीख न मिळाल्यांने सध्या गैरसोय होत असल्याची माहीती देत होते, पारोमितांने भिमबाईचा इलाज करण्यांचे सांगीतले, डॉक्टरनी तीला तपासले, औषधीची चिठठी पारोमिताचे हातात देत या औषधी व सलाईन घेवून या, असे सांगीतले.

पारोमिताने चिठठीवर नजर टाकली, एवढया बेसिक सलाईन ग्रामिण रूग्णालयात उपलब्ध नाहीत? हा भाग उपोषणग्रस्त आहे, आदिवासी दुर्गम भाग आहे, साधे सबसेंटरवर राहणाऱ्या औषधा येथे नाहीत? पारोमिताचा आवाज चढत होता, मात्र कार्यकर्त्यांनी परिस्थितीकडे लक्ष द्या, आधी इलाज होणे आवश्यक आहे, हे सांगताच, पारोमिताने पर्समधील दिडशे रूपये मुर्लीधर कोडापेच्या हातात ठेवले. लवकरच 4 सलाईन आणि काही औषधी घेवून मुर्लीधर तेथे आला. सायंकाळपर्यंत भिमबाई ठिक झाली. राहीलेल्या सलाईन आणि औषधी रूग्लालयात डॉक्टरकडे ठेवून घ्यायला सांगीतले, भिमबाईला घेवून कोरपणा पोलिस स्टेशनला तक्रार दिली. आरोपीवर गुन्हा दाखल झाला. भिमबाईला सरंक्षण देण्याबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी यांना सुचना देवून, तीला ऑटो करून येल्लापूरला रवाणगी करीत, पारोमितासह सर्व कार्यकर्ते आंबेझरीला शिबीर स्थळी उपस्थित झाले. रात्रौ सर्व कार्यकर्त्यांची बैठक झाली. आदिवासींना धमकावून गैरआदिवासी शिबीरात येवू देत नसल्यांची माहीती तेथील कार्यकर्ते लक्ष्मण उदे, नामदेव उदे या कार्यकर्त्यांनी दिली. त्यावेळी जिल्हयात शिवसेनेचे नेते असलेले दिलीप कपूर माणिकगड पहाडावर आले, त्यामुळे गैरआदिवासी आणखी आक्रमक झालेत.

दुसरे दिवशी, पारोमिता गोस्वामी, आबीद अली यांचेसह सर्व कार्यकर्ते नंदप्पा येथे गेले, तेथे आबीद अली आणि आमच्या गाडयाखाली तुराटया टाकून पेटविण्यांच्या प्रयत्न केला गेला. नंतर माहीती मिळाली कि, 50 मिटर पुढे पुलाखाली लोखंडी रॉड आणि तलवारी ठेवण्यात आल्या होत्या, त्यादिवशी जमिनीकडे गेले तर, सशस्त्र हल्ला करण्यांचा बेत होता. त्याच दिवशी काही कार्यकर्ते नागापूर, धोंडार्जुनी कडे गेले होते, त्यांचे गाडीवर दगडफेक झाली, गाडीचे काचा फुटल्या, कार्यकर्ते जीव वाचविण्यासाठी थेट आंध्रप्रदेश मार्गावरून, आंबेझरीला आले. या सर्व हल्याचे निमीत्त दिलीप कपूर असल्यांचे लक्षात आल्यानंतर, त्यांचे विरोधात गडचांदूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली. त्यानंतर मात्र ते नंतर कधीही श्रमिक एल्गारच्या लढयाचे विरोधात भूमिका घेतली नाही. गाडयावर हल्ले होत असल्यांने, गाडी मालकांनी गाडया परत नेल्यात, संघटनेपुढे अडचण निर्माण झाली. मूलला पारोमिता गोस्वामी व विजय सिध्दावार परत आलेत, विजय सिध्दावार हे शिक्षक असल्यांने, त्यांना महिंद्रा मॅक्स गाडीसाठी मारोडाचे बँकेने दोन दिवसात कर्ज दिले, यासाठी मूलचे संतोष रावत यांनीही मदत केली. नंतर परत नवीन गाडी व मूलचे अस्लम शेख यांना गाडीची भरपायी करून देण्यांच्या हमीवर त्यांची गाडी किरायाणे नेली. ज्या गावात कार्यकर्त्यांवर हल्ले झाले, त्या नागापूर येथे जाण्यांचा निर्णय झाला. सकाळी पोलिस बंदोबस्तात, नागापूर येथे झाडू कोडापे यांचे घरी बैठक चालू होती, कागदपत्रे तपासत असतांनाच अचानक दोन-तीन हजाराच्या जमावानी कार्यकर्त्यांना आणि पोलिसांना घेरले. कुणीही परत जावू नये यासाठी वाटेत बैलगाडया आडव्या लावल्या. पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून, पारोमिता गोस्वामी, आबीद अली, विजय सिध्दावार यांना झोपडीत नेले, गैरआदिवासींने झोपडीचे दार तोडण्यांचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी हाणून पाडला, अखेर झोपडीवर रॉकेल ओतण्यात आले व आग लावणार, तेवढयात काही कोलामांनी, हातात बडगे घेवून गैरआदिवासींना आडवे पाडले, तेथे प्रचंड मारपीठ झाली. बाहेर शिवसेनेचे लोक, आदिवासींना मदत करणाऱ्या आबीद अलीना, 'भाग लवडे पाकिस्तान' म्हणत घोषणा दिल्यात.

काहीच वेळात जिवती, वणी कॅम्प, भारी, पाटण पोलिसांच्या गाडया आल्यात, ठाणेदारांनी, मार्ग काढीत, त्यांचे वाहनात सुरक्षीत गडचांदूर येथे आणून सोडले, या गाडयावरही गैरआदिवासींनी दगडफेक केली. ज्यावेळी पारोमिता गोस्वामी, आबीद अली, विजय सिध्दावार यांना झोपडीत नेण्यात आले, त्यानंतर, पारिश मेश्राम हे धावत-धावत पाटण येथे गेले, तेथे सुदैवाने त्यावेळचे जिल्हाधिकारी संजय जैस्वाल आले होते, त्यांची गाडी अडवून, पारोमितावर हल्ला झाला आहे, कदाचित आतापर्यंत मारलेही असेल असे सांगताच, त्यांनी आपला सर्व बंदोबस्त नागापूरकडे वळविला. दुसरे कार्यकर्ता मारोती कंकलवार, हे तेथून निसटून 7 किमी अंतरावरील जिवती येथे धावत जावून, तेथील पोलिसांना घटनेची माहीती दिली, त्यानंतर तेथूनही पोलिस बंदोबस्त आला.

गडचांदूर पोलिस स्टेशन येथे या घटनेची लेखी तक्रार विजय सिध्दावार यांनी दिली, पोलिसांनी पोलिस पाटीलांसह 75 लोकांवर गुन्हे दाखल केले. 10 वर्ष प्रकरण कोर्टात चालल्यानंतर, हे सर्व गैरआदिवासींनी संघटनेची माफी मागीतली, आदिवासींना आता आमचा त्रास नाही, कोर्टातून आम्हाला सोडवा, आम्हीही गरीब आहोत, अशी विनंती केली. श्रमिक एल्गारने त्यांना माफी दिली. नंतर चंद्रपूर जिल्हयातून श्रमिक एल्गारच्या आवाहनावरून हजारोंनी शिवसेनेच्या विरोधात मुंबई येथे फॅक्स पाठविण्यांचे आवाहन केले, या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला, दोन महिण्यांवर निवडणूका असल्यांने आणि शिवसेनेच्या विरोधात असे आंदोलन होत असल्यांचे पाहून, शिवसेनेचे नेत्यांनी पारोमिता गोस्वामी यांना बोलावून घेतले व यापुढे शिवसेना आदिवासींच्या बाजूने उभी राहील याची ग्वाही दिली. यानंतर मात्र शिवसेनेने आदिवासींच्या जमिनीच्या लढयाचे विरोधात भूमिका घेतली नाही. त्यावेळी जिवती तालुक्यात एकाही आदिवासींकडे दुचाकी नव्हती, मात्र गैरआदिवासी मोठया प्रमाणावर शिक्षक व इतर नौकरीत होते, त्यामुळे त्यांना तत्काळ जमाव जमविणे शक्य झाले, आता मात्र परिस्थिती बदलली आहे, अनेक आदिवासींकडे दुचाकी आहेत, ज्यांचे घरात प्राणघातक हल्ला झाला, तो झाडू काडापे आता त्या गावचा सरपंच आहे.

सुमारे 250 चे वर प्रकरणे तयार झालीत, ती प्रकरणे तहसिलदार मार्फत, उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेत. पाठपुरावा करतांना तेव्हाचे जिल्हाधिकारी संजय जैस्वाल यांनी, धर्मारम येथील पोचू लिंगू सिडाम व इतरांचे प्रकरण आधी घेतले, त्यांचे शेताची मोजणी झाली, आदिवासी विकास विभागामधून सर्वांसाठी घरकुल, .शेतीपुरक साहित्य, आणि जमिनीचे ताबा पावती घेवून धर्मारम येथे, तेथून हुसकावून लावलेल्या कोलामांचे परत महाराष्ट्रात स्वागत केले. 'आम्ही तुमचे त्यावेळी सरंक्षण करू शकलो नाही, परंतू आता तुम्ही महाराष्ट्रात परत या, तुमचे स्वागत आहे' या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, हार टाकून सर्वांचे स्वागत केले आणि आदिवासींना त्यांचे मुळ जमिनी परत मिळाल्या. यानंतर मात्र गैरआदिवासींच्या बाजूने मोठया प्रमाणावर राजकीय दबाव प्रशासनावर आणणे सुरू झाले, त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा वेळकाढू धोरण सुरू केले, श्रमिक एल्गारने काही आदिवासींना घेवून, मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपिठात याचिका दाखल केली, कोर्टांने ही याचिका गांभीर्याने घेतली आणि सर्व आदिवासीच्या जमिनी मुळ रेकार्ड प्रमाणे परत देण्यांचे, शेती पुरक साहित्य, बियाणे, बैल्, बैलजोडया, घरकुल देण्याचे आदेश पारित केले.यामुळे सुमारे 2 कोटी रूपयाचे वर शेतीपुरक साहित्य आदिवासींना मिळाले, घरकुल मिळाले, शेकडो आदिवासींना जमिनी परत मिळाल्या. अजूनही काही तुरळक प्रकरणे येतात, मात्र तेथे आदिवासींवरील गैरआदिवासींची दहशत मात्र कायमची कमी झाली.

या संपूर्ण लढयात 50 च्या वर आदिवासी महिला-पुरूषांवर हल्ले झाले, हातपाय तोडण्यात आले, 50 च्या वर प्रकरणात गुन्हे दाखल झालेत. या लढयांची आठवण म्हणून, आंबेझरी येथे झाडू कोडापे (मोठा) महात्मा गांधीचा पुतळा मांडला, त्याचे अनावरण समाजसेवक विवेक पंडित यांनी केले.

जिवती, राजुरा, कोरपणासह जिल्हयातील सिंदेवाही, नागभीड, मूल, पोंभूर्णा, सावली तालुक्यातील आदिवासींच्या जमिनीही श्रमिक एल्गारने परत मिळवून दिल्या. गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्यातील आदिवासींचे जमिनीही श्रमिक एल्गारने लढा देवून परत मिळवून घेतल्यात.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

अमर कडयाम

ठाणे जिल्ह्यात पारोमिता काम करीत असताना, तेथील आदिवासींना व त्यांच्या जमिनींना संरक्षण देण्याचे मोठे काम त्यांना करावे लागले. वसई-विरार परिसरातील एका आदिवासीच्या जमिनीवर बिल्डरांनी बेकायदेशीर बांधकाम केले होते आणि हे बांधकाम पाडण्याचा उपविभागीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केला होता. मात्र त्याची अंमलबजावणी होत नव्हती. हा आदेश व आदिवासी ला घेऊन पारोमिताने तहसीलदारांना सांगितले की एस.डीएमच्या या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी तुम्ही चला. तहसीलदारांना घेऊन त्या जागेवर गेल्या. मात्र तहसीलदारांनी अतिक्रमण न काढताच परत गेले आणि नंतर त्या ठिकाणी पारोमिता आणि तू जमीन मालक आदिवासी तिथेच थांबले. त्यांच्याभोवती त्या भागातील नामवंत गुंड वासू नंबियार व त्याच्या गुंडांनी घेराव केला. ही माहिती कुणीतरी पोलिसांना दिली पोलीस त्या ठिकाणी आले आणि पारोमिताला व त्या आदिवासींना गाडीत बसविले. पोलीस स्टेशन मध्ये गेल्यानंतर पारोमिताला बोलले, 'पागल लडकी हो क्या? गुंडे है, हितेश ठाकूर, पप्पू कलानी के आदमी है मार डालेंगे' पण पारोमिता ने आपली जिद्द सोडली नाही अधिक कार्यकर्ते घेऊन पुरेसा पोलीस बंदोबस्त घेऊन त्या आदिवासींच्या जमिनीवरील अतिक्रमण तिने काढायला लावलेच.

# मजूरांची सोडवणूक आणि मजूरीचे प्रश्न

जिल्हयात विशेषत: ब्रम्हपुरी, नागभीड, सिंदेवाही, सावली, चिमूर तालुक्यात रोजगारांचे विशेष साधने नाहीत. त्यामुळे या भागातील तरुण मोठया प्रमाणावर रोजगारासाठी पुणे, नाशिक, मुंबई, रत्नागीरी, सुरत, चिन्नूर, तिरूपती, बंगलोर, हैद्राबाद इत्यादी मोठया शहरात फॅक्ट्रीच्या कामावर जातात. विशेषत: उन्हाळयांच्या सुटयात मजूरांच्या स्थलांतरात मोठी वाढ होते. हे तरुण अनेकदा ठेकेदारामार्फत कामावर जातात आणि तिथे या मजूरांचे शोषण केले जाते. ठरविलेल्या वेळेपेक्षा अधिक काम करवून घेणे, मजूरी न देणे, मारहाण करणे, परत येऊ न देणे यासारखे छळ ठेकेदार आणि कंपनीकडून केला जातो.



असेच एक प्रकरण रत्नागिरी येथे उघडकीस आले. शाळेत प्रवेशाची वेळ येवूनही कंपनीवाले युवकांना परत येऊ देत नव्हते. सुरक्षा रक्षकांकडून त्यांना मारहाण केली जायची, या कंपनीतून उसेगांव तह. सावली येथून दोन मुले पळून आली आणि रत्नागिरीत अडकलेल्या तरुणांची परिस्थिती सांगितली. उसेगांव गाव कमेटीने हा प्रकरण संघटनेकडे आणताच, संघटनेच्या अध्यक्षा पारोमिता गोस्वामी यांनी कार्यकर्ते आणि पळून आलेले उसेगांव येथील तरुणांसह 'एक्झाटिका फूड प्रोसेस कंपनीवर' धाड टाकली. 800 चे वर तरुणांची सुटका केली. किमान वेतन आयोगाप्रमाणे मजूरी मिळवून दिली आणि सबंधित ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले.

रत्नागिरीची माहिती सर्वत्र पसरताच वेगवेगळया शहरातून अशा त्रस्त युवकांचे फोन आले आणि श्रमिक एल्गारने सतत चार वर्ष अशा प्रकारच्या पीडित युवकांची सुटका केली.

फ्रुट कंपनीसह, बांधकाम, तेंदू पत्ता, इतर कंपन्यामधूनही अशा युवकांची सुटका केली. चार वर्षात 6500 तरुणांना न्याय मिळवून देण्यात श्रमिक एल्गारला यश आले. केवळ राज्यातच नाही तर, आंध्रप्रदेश, केरळ, गुजरात, छत्तीसगड, मध्यप्रदेशातूनही या मजूरांना श्रमिक एल्गारने न्याय मिळवून दिला.

याशिवाय, स्थलांतरीत मजूरांचे, रोहयो वरील मजूरांचे कामगारांचे 35 केसेस कामगार आयुक्तांकडे दाखल करून न्याय मिळवून दिला. 20 वर्षात 15 कोटी रूपयाची वर मजूरी श्रमिक एल्गारने काढून दिली.

इमारत बांधकाम मजूरांसाठी शासनाने अटल विश्वकर्मा बांधकाम मजूर योजना आणली. या योजची माहिती, प्रचार, प्रसार श्रमिक एल्गारने केला. यासाठी विरूर स्टेशन, मूल येथे कन्नमवार सभागृहात मेळावे घेण्यात आले. श्रमिक एल्गारच्या माध्यमातून 1200 मजूरांची नोंदणी करण्यात आली व त्यांना लाभ मिळणे सुरू झाले आहे. मूल तालुक्यातील ग्रेटा एनर्जी व पृथ्वी फेरो ॲलाय कंपनीतील मजूरांनाही, किमान वेतनाप्रमाणे मजूरी देण्यात यावी यासाठी कामबंद आंदोलन केले आणि अशी मजूरी देणे कंपनीला भाग पडले.



# आमची एल्गारबाई!

भाषा आणि प्रांतांच्या अस्मिता ओलांडून हेतूपूर्वक स्वत:ला एखाद्या क्षेत्रात झोकून देणं सोपं नाही. त्यातही खात्यापित्या घरातली, सुखात लोळू शकणारी मुलगी जंगलखोऱ्यांत आव्हानात्मक प्रश्नांना सामोरं जाण्याचा निर्णय स्वत:हून घेते आणि तो ताकदीनं निभावूनही नेते, तेव्हा कौतुकापेक्षा आदरच अधिक वाटू लागतो.

पारोमिता गोस्वामी हिच्याबद्दलही हीच भावना मनात येऊ शकते.अभ्यासू नगररचनातज्ज्ञ आणि समपिर्त समाजवादी कार्यकर्ते प. बा. तथा बाबुराव सामंत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा दुसरा संघर्ष पुरस्कार मिळाला. रचनात्मक संघर्षाद्वारे बहुजनांचं आयुष्य सुखकर बनवता येतं यावर बाबुरावांचा पूर्ण विश्वास होता.

केवळ रचना, केवळ संघर्ष, केवळ अभ्यास किंवा केवळ परिश्ाम हे निराशेकडे आणि पराभवाकडे जाणारे मार्ग आहेत; पण त्या सर्वांची योग्य सांगड घातली तर असंख्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचं हसू आणणारा हमरस्ता पायाखाली येतो हे नागरी निवारा परिषदेच्या माध्यमातून बाबुरावांनी मांडलेलं गणित त्यांच्याकडं कधीही शिकवणी न लावलेल्या पारोमिताला चांगलंच अवगत आहे. कोलकात्यातली ही मुलगी शिकली समाजकार्य महाविद्यालयांत; पण रमली आदिवासी व सर्वसामान्य माणसाच्या हक्कांच्या लढ्यांमध्ये. १९९०च्या दशकात श्रमजीवी संघटनेबरोबर तिनं पूर्णवेळ काम केलं.



वेठबिगार, मजूर यांच्या रोजगार, शिक्षण आणि राजकीय अधिकारांचा पाठपुरावा करत असतानाच चंदपूरमधील चिन्ना मट्टामी या आदिवासी तरुणाची नक्षलवादी समजून पोलिसांनी केलेली हत्या तिला हलवून गेली. चिन्नाची आई जब्बेबाई निर्धारानं लढली. या लढ्यात पारोमिता तिच्याबरोबर होती. यानंतर १९९९पासून तिनं चंदपूर जिल्हा हेच आपलं कार्यक्षेत्र मानलं. 'श्रमिक एल्गार' या संघटनेमार्फत तिनं आदिवासींच्या जमिनीच्या हक्कांचा लढा उभा केला. जमीन अधिकाराची अनेक प्रकरणं तिनं लावून धरली. हे करताना तिला जाणवलं की आदिवासींबरोबरच गावातील अल्पभूधारकांचे प्रश्ान् तितकेच तीव्र आहेत. तिच्या कामाचा परीघ रुंदावत गेला.

आज श्रमिक एल्गारचे १० हजार सभासद आहेत. पतपेढी, तेंदुपत्ता या व्यवहारांसाठी सहकारी संस्थांचं जाळं उभारलं गेलं आहे. साक्षरतेपासून विज्ञान प्रयोगशाळा, विशेष शिकवण्यांपर्यंत तसंच स्थानिक नेतृत्व क्षमतांपासून राजकीय लोकप्रतिनिधित्वापर्यंत प्रशिक्षण देणारे उपक्रम श्रमिक एल्गारतर्फे चालवले जातात. गावातल्या समस्या सोडवण्यासाठी 'जाहीर पंचनामा' बैठका लावल्या जातात. सध्या शेतीविकास फंडाच्या कल्पनेनं तिला पछाडलं आहे. चिटेगावसारख्या छोट्याशा खेड्यात राहणाऱ्या पारोमिताचा आठवड्याला किमान ४०० कि.मी. प्रवास होतो यावरून तिच्या कामाचा झंझावात लक्षात यावा. साथ देणारा पती आणि चिमुकली रूचिकाही आता तिच्या सोबत आहेत.



श्रमिक एल्गार
द्विदशक वर्षपूर्ती

अमित राऊत

चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीचे आंदोलन सुरू असताना, जनजागृतीसाठी गावागावात सभा सुरू होते. राजुरा तालुक्यातील लक्कडकोट येथे महिलांनी अशीच एक सभा बोलावली. पारोमिता गोस्वामी कार्यकर्त्यांसह या गावात गेल्या असता त्यांना कळले की, दारूवाल्यांनी सभा होऊ नये म्हणून मंडपवाल्यालाच गायब केले. पारोमिता गोस्वामी महिलांना धीर देत, मी पुन्हा येईल असे सांगत असतानाच, महिलांनी सांगितले की नाही, सभा आजच होईल आणि या महिलांनी नंतर घरोघरी जाऊन आपल्या साड्या लुगडी आणले. साड्या लुगड्याचा मंडपात दारूबंदीची जोरदार सभा लक्कडकोटमध्ये झाली आणि दारू विक्रेत्यांना चांगले उत्तर दिले.

# बांबु कारागीरांना श्रमिक एल्गारची साथ

बांबू कारागीर हे चंद्रपूर जिल्हयातील अतिशय महत्वाचा घटक आहे, चंद्रपूर जिल्हयात सर्वत्र बांबू कारागीर आहेत. मात्र या बांबू कारागीरांना कायदेशीर व्यवसाय करण्यापासून सरकारी यंत्रणा आणि शासकीय धोरणाचा अडसर आहे. वनविभागाचे कर्मचाऱ्यांचा जाच सहन करून, बांबू कारागीर आपला व्यवसाय करीत आहे.

संघटनेच्या सुरूवातीच्या काळात मूल येथील बांबू कारागीरांनी बांबू मिळत नसल्यांची तक्रार केली. संपत कुमरे आणि बाबूराव कळाम यांनी या तक्रारी श्रमिक एल्गारकडे आणल्या. या बांबू कारागीरांना मूल येथील डेपोतून बांबू मिळवून दिले. बांबू घेतेवेळी लक्षात आले कि, सरकार बल्हारपूर पेपर मीलला 40 पैशात जे बांबू देते, त्याच बांबूसाठी बांबू कारागीराला 20 रूपये आकारते. या अन्यायाच्या विरोधात श्रमिक एल्गारने शासनाकडे पत्रव्यवहार केला.

बांबू कारागीरांना देण्यात येणारे 'बेसोड कार्ड' देणे शासनाने मध्यंतरी बंद केले होते, या बांबू कारागीरांना बेसोड कार्ड देण्यांची मागणी श्रमिक एल्गारने लावून धरली आणि मूल तालुक्यातील डोणी, फुलझरी, चिचाळा, सावली तालुक्यातील मुंडाळासह सिंदेवाही तालुक्यातील 1500 चे वर बांबू कारागीरांचे बेसोड कार्ड श्रमिक एल्गारच्या मदतीने तयार करण्यात आले.

सावली तालुक्यातील पेंढरी येथील वनकर्मचारी तेथील बांबू कारागीरांना त्रास देत होता, श्रमिक एल्गारने आंदोलन करताच, तो त्रास बंद झाला आणि त्यांचा व्यवसायही सुरूळीत झाला. बांबू कारागीरांना मोफत बांबू देण्यात यावे अशी श्रमिक एल्गारची मागणी आहे, त्यासाठीचा लढा सुरू आहे. वनविभाग बांबूची रॉयल्टी घेते व त्यावर बांबू कटाई, ढुलाई, नाक्यावर ठेवण्यांचा खर्च घेवून, हाच बांबू कारागीरांना 30 रूपयाच्या वर किंमतीत विकते. श्रमिक एल्गारच्या मागणीनंतर, बांबूवरील रॉयल्टी सरकारने माफ केली. याचा आधार घेवून, बांबू कारागीर ठरलेल्या दिवशी वनविभागाकडे नोंदणी करून जंगलात जातील आणि त्यांना आवश्यक बांबू ते आणतील व थेट घरी नेतील. त्यामुळे त्यांना बांबू शुन्य पैशात पडेल असा प्रस्ताव श्रमिक एल्गारचे अध्यक्षा ॲड. पारोमिता गोस्वामी यांनी उपवनसंरक्षक (बफर) यांना दिला. प्रायोगीक तत्वावर सिंदेवाही तालुक्यातील मोहाडी येथे अशा पध्दतीने काम सुरू झाले. यातून बांबू कारागीरांना लाभही मिळाला, मात्र यामुळे वनविभागाच्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांना मिळणारी मिळकत बंद झाल्यांने, या योजनेला त्यांनी साथ दिली नाही. बांबू कारागीरांना मोफत बांबू व ग्राम पंचायत स्तरावर बांबू देण्यात यावे, बांबू कारागीरांवरील वनकर्मचाऱ्यांकडून अन्याय दूर करावा या मागणीसाठी मुख्यवनसंरक्षक, उपवनसंरक्षक, यांचे कार्यालयावर श्रमिक एल्गारने आजवर 12 मोठे मोर्च काढले आहे.



बांबू कारागीरांचे बेसोडकार्ड वनविभाग स्वतकडेच ठेवून, बांबू कारागीरांना मिळणारे सवलतीचे बांबू ठेकेदारांना देत असल्यांचे सिंदेवाही येथे उघडकीस आणले. उपवनसंरक्षक ब्रम्हपुरी यांचे समक्ष हा भ्रष्टाचार सिंदेवाही तालुक्यातील मोहाडी, सरडपार, मूल तालुक्यातील राजोली येथील बांबू कारागीरांना घेवून पारोमिता गोस्वामी यांनी वन अधिकाऱ्यांना धारेवर धरले. गडचिरोली जिल्हयातील आरमोरी येथील बांबू कारागीरांनाही बांबू मिळवून देण्यात श्रमिक एल्गारला यश आले आहे. बांबू कारागीरांना मोफत बांबू देण्यात यावा यासाठीचा लढा पारोमिता गोस्वामी लढवित असून, जोपर्यंत बांबू कारागीरांना न्याय मिळत नाही तोपर्यंत श्रमिक एल्गार बांबू कारागीरांसोबत आहे.

# मूल तालुक्यातील पहिली शाखा



मूल तालुक्यात प्रथमतः 2001- 2002 मध्ये टेकडी येथे श्रमिक एल्गार संघटनेचे कार्य सुरू झाले. अनुसया माधव घोडाम या टेकडी येथील सरपंच असतांना रेखाबाई गादेवार उपसरपंच होत्या. तेव्हा ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये उपसरपंच यांनी आदिवासी महिलांवर जातीवाचक शिवीगाळ केली व तिथे मोठ्या प्रमाणात मारपीठ झाली आणि त्याच ग्रामसभेतील आदिवासी महिलांची सोन्याची नथ हरविली. मारुती शेंडे व इतर गावकरी या सदर प्रकरणाची तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशन मध्ये आले तर पोलीस स्टेशनमध्ये कारवाई करण्यास टाळाटाळ करीत होते. त्यानंतर मुल येथील विजय सिद्धावार यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत सदर प्रकरणाची चर्चा करण्यात आली.

विजय सिद्धावार यांनी या प्रकरणाबाबत सांगितले. त्यांच्या मदतीने या प्रकरणाची तक्रार दाखल करण्यात आली. तक्रार नोंदविल्यानंतर ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल झाला. त्यानंतर मग टेकडी येथे सभा घेण्यात आली. त्या नंतर या संघटनेची स्थापना झाली. रेखा गादेवार यांनी लोकांना हाताशी घेऊन श्रमिक एल्गारच्या सदस्यांवर खोट्या तक्रारी नोंदविल्या. तरीपण या खोट्या तक्रारीला न जुमानता गावातील सगळे लोक संघटनेचे कार्य करीत राहिले. पोलीस या तक्रारी विषयी चौकशी करीत होते. मात्र, काही माहिती मिळाली नाही. त्यानंतर गावात वेठबिगार प्रकरण घडले. टेकडी येथील मोहम्मद अली अजगर सय्यद अली हा कसायाचा व्यवसाय करीत होता.

त्याच्याकडे माझा मोठा भाऊ विश्वनाथ विठोबा शेंडे कुटुंबासह पत्नी मुला मुलगी एकूण चार जण त्याच्याकडे अनेक दिवस वर्षांपासून काम करत होते. पण त्याची मजुरी त्यांना नियमितपणे देत नव्हता. त्यानंतर विश्वनाथ शेंडेला आपल्या सर्व कुटुंबाची मजुरी मागण्यासाठी गेला असता मोहम्मद अली सय्यद यांनी मारपीट केली. त्यांनी ही सगळी माहिती मारोती शेंडे यांना सांगितली, त्यांनी हे प्रकरण ताईकडे दिले. त्यानंतर आम्ही त्या मालकाची तक्रार केली आणि त्यांना पोलिसांनी अटक केली आणि त्यानंतर या विरोधात मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली. या याचिकेला सहा महिने लागले आणि निकाल लागला तर विश्वनाथ शिंदे यांचे वेठबिगार प्रकरण सिद्ध झाले आणि शासनाकडून मदत म्हणून 20,000 रुपये मिळाले.



- मारूती विठोबा शेंडे
टेकडी



## श्रमिक एल्गार
### द्विदशक वर्षपूर्ती

## आगामी ध्येय

* वनहक्क गैरआदिवासीधारकांकरिता असलेली तीन पिढ्यांची रद्द करण्याचा पूर्ण प्रयत्न
* निराधार महिलांना दोन हजार रुपये अनुदान मिळवण्यासाठी संघर्ष
* चंद्रपूर जिल्ह्यात गाव तिथे बस या धर्तीवर प्रत्येक गावात एसटी बस जाईल यासाठी पाठपुरावा
* जंगलाच्या शेजारी राहणाऱ्या शेतकरी, शेतमजूर महिलांना न्याय देण्यासाठी हलदा ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न
* गरिबांना घरकुल मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न
* रोजगार निर्मितीसाठी रोजगारांचे नवे आधुनिक मॉडेल्स तयार करणे आणि त्यातून महिला व युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे
* शेतीच्या सिंचनासाठी आवश्यक कालवे दुरुस्ती व यासाठी लागणारी उपाययोजना यावर काम करणे
* राजुरा येथील अल्पवयीन आदिवासी मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणात पीडितांना न्याय मिळवून देणे दोषीवर कारवाई करणे
* गडचिरोली ते नागपूर व्हाया सिंदेवाही-पाथरी महामार्ग निर्मितीसाठी प्रयत्न
* नवरगाव, पाथरी, मेंडकी या भागातील नागरिक तालुका निर्मितीसाठी प्रयत्न करीत आहेत, त्यांच्या संघर्षाला साथ देणे
* बांबू कारागिरांना हिरवा व मोफत बांबू पुरवठा रणे त्यांच्या तयार मालासाठी बाजारपेठ तयार करून देणे

# समाजकार्य प्रवास



श्रमिक एल्गार हे नांव आता राज्याला नवे राहीले नाही. मागील 20 वर्षात, गरीबांच्या प्रश्नावर, महिलांच्या प्रश्नावर सतत आंदोलनाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारी संघटना म्हणून या संघटनेची ओळख आहे. आंतरराष्ट्रिय शिक्षण संस्थेतून उच्च विद्याविभुषीत ॲड. पारोमिता गोस्वामी यांनी, सर्व भौतिक सुखाचा त्याग केला आणि मुंबई सारखी मायानगरी सोडून, चंद्रपूर-गडचिरोली सारख्या दुर्गम भागातील गरीबांचा आवाज बुलंद केला. त्यांच्या कार्याला सलाम करून, जाणून घेऊया श्रमिक एल्गारचा प्रवास.

1999 साली सिंदेवाही तालुक्यातील चिटकी या आडवळणाच्या गावात श्रमिक एल्गारची स्थापना स्व. हिरामण पाटील येरमे यांच्या अंगणात झाली. गावातीलच आदिवासी शेतकरी गोपाळा गावडे यांना पोलिसांनी बेकायदेशीर अटक केली आणि त्यांच्या सुटकेसाठी कुणीही नेत्यांनी मदत केली नाही. मदत केली, त्या पारोमिता गोस्वामी यांनी. ॲड. गोस्वामी यांनी गोपाळा गावडेची सुटका केली आणि गावात सभा झाली. या सभेत बोलतांना पारोमिता म्हणाल्या, गोपाळावरील अन्याय हा काही एकमेव नाही, जगात गरीबांवर अन्याय होतच असते, आणि अन्याय होवू नये असे वाटत असेल तर, आपली संघटना असणे हाच पर्याय आहे. उपस्थितांना हा पर्याय निवडला आणि बघता-बघता जिल्ह्यातील सामान्यांना एक नवा आवाज मिळाला, श्रमिक एल्गार!

श्रमिक एल्गारच्या कार्याचा अवाका खूप मोठा आहे, मध्यप्रदेशातील शेकडो आदिवासींची वेठबिगारीतून सुटका आणि त्यांचे पुनर्वसन, सिंदेवाही, ब्रम्हपुरी, नागभीड तालुक्यातील हजारो युवक मजूरांचे फ्रुट कंपनीत होणारे शोषण आणि त्यांची मजूरीसह केलेली सुटका असो किंवा गडचिरोली जिल्ह्यातील निरपराध आदिवासी युवकांना पोलिसांनी मारणे आणि नंतर, त्याला नक्षलवादी म्हणून जाहीर करण्यांच्या सरकारी षडयंत्राला पारोमिताने तेवढ्याच ताकदीने चाप दिला. चिन्नाची आई, जब्बेबाई हिला सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढून न्याय मिळवून दिला. राजूरा, जिवती तालुक्यातील हजारो कोलाम गोंड आदिवासींच्या जमिनीचे ताबे पारोमितांने मिळवून दिले. एका आठवड्यात पाच जिवघेणे हल्ले होऊनही दुर्बलांना न्याय मिळवून देण्यापासून त्या जराही डगमगल्या नाहीत. एक ना अनेक हजारो यशस्वी प्रकरणात पारोमिताने वंचितांना न्याय मिळवून दिला आहे. देत आहे,

*त्यांच्या कार्याला सलाम!*

(सरकारमान्य)
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा संचालीत
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्तच नव्हे तर अनिवार्य असा कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
GCC-TBC
इंग्रजी/मराठी/हिंदी कॉम्पूटर टायपिंग कोर्सेस
-सत्र-
(जुलै ते डिसें.)
(जाने ते जुन)
कोर्स कालावधी ६ महिने
वैशिष्ट्ये
१. २ वर्षापासून राज्यात सर्वोत्कृष्ट निकालाकरीता प्रसिध्द
२. संस्थेत प्रथम येणाऱ्या २ विद्यार्थ्यांस पुढील संपूर्ण प्रशिक्षण मोफत.
३. मुली/महिलांकरीता स्वतंत्र बॅचची व्यवस्था व महिला शिक्षीका.
४. २० संगणक संच असलेली अद्यावत लॅब.
५. बस पासची सुविधा.
६. अनुभवी शिक्षक व कुशल मार्गदर्शक असल्याने सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणाची हमी.
७. जीसीसी-टीबीसी हा शासकिय कॉम्प्युटर कोर्स असल्यामुळे सर्व नोकरीत प्रथम प्राधान्य.
८. संगणक व टंकलेखन अभ्यासक्रमाचे एकत्रीकरण असल्यामुळे दोन्ही अर्हता एकाच वेळी पूर्ण करता येते.
प्रवेश देणे सुरू आहे
नियम व अटी लागू....
प्रवेश पात्रता- किमान ८ वा वर्ग पास



विशेष सुचना
सदर कोर्स हा महाराष्ट्र शासन नियंत्रीत असून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा मान्यताप्राप्त टायपिंग इन्स्टिटयूट मध्येच उपलब्ध आहे. इतर कोणत्याही कॉम्पूटर इन्स्टिटयूट मध्ये नाही.
सरकारमान्य
अलंकार कॉम्प्यूटर टायपिंग इन्स्टिटयूट,
सोमनाथ रोड, नगर परिषद जवळ, मूल मो.नं. ९८२३७४१८३४, ९९७५६९०८४८, ९७६५३२७७०६



www.paromitagoswami.com
www.facebook.com/paromita.elgar
www.twitter.com/ParoChandrapur

मिस्ड कॉल करूया
श्रमिक एल्गारचे सदस्य होऊया
7231956788

▪ Website ▪ Hosting
▪ Domain ▪ Design
▪ Bulk SMS
▪ Bulk Voice Call
7264982465
Kavyashilp Digital Media

@H!te$HArts : 9850569216